# १. सारांश

## १.१ प्रस्तावना

दी टाटा पॉवर कंपनी लिमिटेडही कंपनी सन १९१९ मध्ये प्रस्थापित झाली. दी टाटा हायड्रो–इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (सन १९१० मध्ये प्रस्थापित) आणि दी आंध्रा व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (सन १९१६ मध्ये प्रस्थापित) या कंपन्या एप्रिल १, २००० रोजी एकच कंपनी म्हणून टाटा पॉवरमध्ये विलीन करण्यात आल्या. या विलीनीकरणाचा परिणाम म्हणून वर उल्लेखिलेल्या कंपन्यांचे परवानेही विलीन झाले आणि महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे दिनांक १२ जुलै २००१ च्या संमत ठराव क्र. आयईए–२००१ / सीआर–१०५०९ / एनआरजी-१, अन्वये टाटा पॉवरला मुंबई परवाना क्षेत्रातील नागरिकांना आणि घाऊक प्रमाणात वीज वितरण परवानाधारकांना वीज पुरवण्याचा परवाना देण्यात आला. सन्माननीय आयोगाने टाटा पॉवर–जीला इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ अंतर्गत पारेषण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आहे. टाटा पॉवर–जीतर्फे सन्माननीय आयोगास गतकाळासाठी एआरआर आणि टेरिफ पिटिशन्स सादर करण्यात आले आहेत, तसेच आपला पहिला बहुवर्षीय-दर–निश्चितीकरण विनंती अर्ज आवश्यक स्वरुपात सादर केला आहे.

वीज दर नियमनाच्या तरतुदींनुसार बहुवर्षीय-दर–निश्चितीकरण आदेशानंतर, परवानाधारक किंवा वीज निर्माण करणाऱ्या कंपनीच्या मान्यताप्राप्त अंदाजित ॲन्युअल रेव्हेन्यू रिक्वायरमेन्टबरोबर परवानाधारक किंवा वीज निर्माण करणाऱ्या कंपनीच्या वार्षिक कामगिरीच्या केलेल्या तुलनेचा आणि मान्यताप्राप्त वीजदर आणि शुल्कांद्वारे अपेक्षित महसुलाचा समावेश असलेला ॲन्युअल पर्फॉर्मन्स रिव्ह्यूचा अर्ज परवानाधारक किंवा वीज निर्माण करणाऱ्या कंपनीने करणे आवश्यक आहे. या दस्तऐवजामध्ये टाटा पॉवरच्या (टाटा पॉवर-जी) वीज निर्मिती व्यवसायाबाबतच्या ॲन्युअल पर्फॉर्मन्स रिव्ह्यू आणि टेरिफ ॲप्लिकेशनचा तपशील आहे व त्यात (१) आ.व.२००६-०७ मधील कामगिरीचा सत्य-पडताळा, (२) आ.व.२००७-०८ च्या कामगिरीचे पुनरावलोकन आणि (३) आ.व.२००८-०९ संदर्भात प्रक्षेपित कामगिरीचा आणि (४) आ.व. २००९-१० साठीच्या वीज दर प्रस्तावाचा समावेश आहे.

## १.२ या विनंती अर्जासंदर्भातील सर्वसाधारण पध्दत

हा सादर होत असलेला ॲन्युअल परफॉर्मन्स रिव्ह्यू आणि वीज दर प्रस्ताव सन्माननीय आयोगाने नियमनात उल्लेख केलेल्या तत्वांवर आणि संदर्भित टेरिफ ऑर्डर्स (आ.व.२००७-०८ साठीचा बहुवर्षीय वीज दर आदेश आणि आ.व.२००८-०९ ते आ.व.२००९-१० या कालावधीसाठीचा एपीआर आदेश) यावर आधारित आहे. या विनंती अर्जासंदर्भात अवलंबिलेल्या सर्वसाधारण पध्दतीतील महत्वाचे मुद्दे पुढे दिले आहेत :

### १.२.१ आ.व. २००७-०८ साठी सत्य-पडताळा

आपल्या (आ.व. २००७-०८ साठीच्या) वीज निर्मिती व्यवसायासंबंधीच्या एपीआर अर्जात टाटा पॉवर – जी ने आ.व.२००७-०८ च्या कामगिरीत पहिल्या सहामाहीतील म्हणजे एप्रिल ते सप्टेंबर २००७ दरम्यानची प्रत्यक्ष कामगिरी आणि दुसऱ्या सहामाहीतील, म्हणजेच ऑक्टोबर २००७ ते मार्च २००८ दरम्यानच्या सुधारित अंदाजित कामगिरीवर आधारित अहवाल सादर केला होता.

टाटा पॉवर – जीच्या वीज निर्मिती व्यवसायाबद्दलच्या विविध कामगिऱ्यांविषयी आणि खर्चाशी संबंधित निकषांबाबतच्या प्रत्यक्ष कामगिरीबाबतचा हा अर्ज टाटा पॉवर – जी सादर करत आहे. परंतु दीर्घ मुदतीसंदर्भातील व्याज, वर्किंग कॅपिटलवरील व्याज, इक्विटीवरील परतावा आणि बांधकाम-उभारणीच्या काळातील व्याज यासारख्या घटकांचा हिशोब सन्माननीय आयोगाने विविध नियमने आणि आदेशांद्वारे मान्यता दिलेल्या नॉर्मेटिव्ह तत्वांवर आधारित असेल. टाटा पॉवर – जी आ.व.२००७-०८ च्या महसुलाचा, टाटा पॉवर – जी चे ॲग्रेगेट एआरआर आणि त्यातील तूट/वाढ याचा विचार करताना

यापूर्वीच्या अर्जांमधे नमूद केलेल्या तत्वांनुसारच विचार करेल व ही तत्वे संदर्भासाठी यापुढील काही परिच्छेदांमधे पुन्हा नमूद करण्यात आली आहेत.

### १.२.२ आ.व.२००८-०९ चा ॲन्युअल परफॉर्मन्स रिव्ह्यू आणि आ.व.२००९-१० साठीचे सुधारित अंदाजपत्र

माननीय आयोगाच्या निर्देशनानुसार, आ.व.२००८-०९ करिता टाटा पॉवर-जी आपल्या वीज निर्मिती व्यवसायासंदर्भातील या वर्षाच्या (आ.व.२००८-०९) पहिल्या सहामाहीमधील प्रत्यक्ष कामगिरीवर आणि दुसऱ्या सहामाहीच्या पुनर्रचित अंदाजावर आधारित असलेला ॲन्युअल पर्फॉर्मन्स रिव्ह्यू अर्ज सादर करीत आहे. तसेच गेल्या वर्षाच्या कामगिरीवर आधारित असलेले आ.व.२००९-१० साठीचे आपले पुनर्रचित अंदाजपत्रक टाटा पॉवर-जी सादर करीत आहे.

### १.२.३ मालमत्ता आणि खर्चाचे विभाजन

या अर्जासाठी टाटा पॉवरकडे सध्या उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधाराने कार्यक्षेत्रानुसार खर्चाची विभागणी करण्यात आली आहे. वीज निर्मिती, पारेषण, वितरण, पुरवठा, हेड ऑफिस (एचओ) आणि सपोर्ट सर्व्हिस (एसएस) अशा कार्यक्षेत्रांसंदर्भात ("फंक्शनल एरियाज्") टाटा पॉवर माहिती जमा करते. तसेच या कार्यक्षेत्रांच्या संदर्भात मालमत्तेचा तपशील असणारे ॲसेट रजिस्टरदेखील टाटा पॉवरतर्फे राखण्यात येते.

वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण या कार्यक्षेत्रांमध्ये ("बेसिक एरियाज्") हेड ऑफिस आणि सपोर्ट सर्व्हिसेस या कार्यक्षेत्रातील मालमत्ता आणि खर्चाचे विभाजन करण्यासाठी बहुवर्षीय वीज दर अर्जात वापरलेल्या आणि भाग ३.३ मध्ये स्पष्ट केलेल्या तत्वांचाच आधार घेतलेला आहे.

### १.२.४ टाटा पॉवर – जीच्या क्षमतेचे विभाजन

#### १.२.४.१ सध्याची क्षमता

दिनांक ६ नोव्हेंबर २००७ च्या आपल्या आदेशाद्वारे सन्माननीय आयोगाने टाटा पॉवर – जी आणि बीईएसटी आणि टाटा पॉवर – जी आणि टाटा पॉवर – डी दरम्यानचा वीज खरेदी करार किंवा पॉवर परचेस ॲग्रीमेंट (पीपीए) ला मान्यता दिली आहे, ज्याचा परिणाम सन्माननीय आयोगाने टाटा पॉवर – डी आणि बीईएसटी च्या टेरिफसंदर्भात दिलेल्या आदेशांमध्येदेखील दर्शविलेला आहे. या करारांमधे टाटा पॉवर – जीची सध्याची आणि पुढील काळातली निर्मिती क्षमता विशिष्ट कोष्टकानुसार विभागण्याचे मान्य करण्यात आले आहे. करारांमधे मान्य केलेल्या निर्मिती क्षमतेच्या विभाजनाच्या आधाराने हा अर्ज तयार करण्यात आलेला आहे.

करारकृत क्षमता आणि उपलब्ध उर्वरित क्षमता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असेल :

तक्ता १.१ : करारकृत क्षमता

| | टाटा पॉवर–जी बरोबरच्या पीपीएची स्थिती | सध्याच्या प्लँट्समधून प्रक्षेपित अंदाज करण्यासाठी विचारात घेतलेली करारकृत क्षमता (मेगावॅट) | % |
|---|---|---|---|
| बीईएसटी | स्वाक्षरीकृत आहे. | ८०० | ४५.०२ |
| टाटा पॉवर – डी | स्वाक्षरीकृत आहे. | ४७७ | २६.८४ |
| उर्वरित क्षमता | | ५०० | २८.१४ |
| एकूण | | १,७७७ | |

आरइन्फ्राने अद्याप टाटा पॉवर–जीबरोबर कोणत्याही प्रकारच्या पीपीए करारावर स्वाक्षरी केलेली नाही याची कृपया नोंद घ्यावी. (कोणत्याही प्रकारची बांधिलकी गृहीत न धरता) सध्याच्या एकूण निर्मिती क्षमतेपैकी उर्वरित क्षमतेचे, म्हणजेच बीईएसटी आणि टाटा पॉवर–डीला वाटप करुन उरलेल्या ५०० मेगावॅट विजेची विक्री सन्माननीय आयोगाने आरइन्फ्रासाठी निश्चित केलेल्या दरानुसार तात्पुरत्या काळासाठी काटेकोरपणे प्रत्येक दिवशी आणि दिवस-दर-दिवस पध्दतीने आणि जोपर्यंत टाटा पॉवर – जी या उर्वरित ५०० मेगावॅट क्षमतेसाठी योग्य असा दुसरा खरेदीदार मिळवून त्याचेबरोबर पीपीए करार करत नाही तोपर्यंत केली जाईल या गृहीतकावर आधारुन आ.व. २००९-१० करिता टाटा पॉवर–जीच्या एकत्रित आणि निव्वळ वीज निर्मितीचा प्रक्षेपित अंदाज आणि त्यानुसार येणाऱ्या महसुलाची निश्चिती करण्यात आली आहे. उल्लेख केलेल्या उर्वरित ५०० मेगावॅट क्षमतेपैकी आरइन्फ्राला केल्या जाणाऱ्या विक्रीमुळे या ५०० मेगावॅट क्षमतेसंदर्भात किंवा त्याच्या अंशरुप क्षमतेसंदर्भात दीर्घ मुदतीचा पीपीए करार करण्याच्या आणि त्याद्वारे कोणत्याही परवानाधारकाला किंवा ग्राहकाला ती वीज विकण्याच्या इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या कलम १०(२) च्या तरतुदींनुसार असलेल्या टाटा पॉवर–जीच्या हक्कास कधीही आणि कोणत्याही प्रकारची बाधा होणार नाही.

#### १.२.४.२ युनिट ८ ची क्षमता

६ नोव्हेंबर २००७ रोजी करण्यात आलेल्या पीपीए करारांमध्ये जानेवारी २००६ मध्ये कार्यान्वित होण्याची अपेक्षा असलेल्या युनिट क्र.८ च्या २५० मेगावॅट क्षमतेपैकी १५० मेगावॅट क्षमतेच्या विभाजनाचाही समावेश आहे. या पीपीए करारांद्वारे युनिट क्र.८ च्या क्षमतेपैकी  बीईएसटीला १०० मेगावॅट आनि टाटा पॉवर–डीला ५० मेगावॅट क्षमता देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. युनिट क्र.८ च्या उर्वरित १०० मेगावॅट क्षमतेसाठी टाटा पॉवर ट्रेडिंग कंपनी लिमिटेड (टीपीटीसीएल) (टीपीटीसीएल पीपीए क्षमता) यांचेबरोबर करार करण्यात आला आहे.

तक्ता १-२: युनिट क्र.८ ची करारकृत क्षमता

| | टाटा पॉवर–जी बरोबरच्या पीपीएची स्थिती | युनिट क्र.८ मधून प्रक्षेपित अंदाज करण्यासाठी विचारात घेतलेली करारकृत क्षमता (मेगावॅट) | % |
|---|---|---|---|
| बीईएसटी | स्वाक्षरीकृत आहे. | १०० | ४०.०० |
| टाटा पॉवर – डी | स्वाक्षरीकृत आहे. | ५० | २०.०० |
| टीपीटीसीएल | | १०० | ४०.०० |

### १.३ आ.व. २००७-०८ मधील कामगिरी

लेखापरीक्षित अहवालाच्या आधारे या भागामधे आ.व.२००७-०८ च्या कामगिरीचा विचार करण्यात आला आहे. त्यामधील विविध घटक पुढीलप्रमाणे :

## १.३.१ आ.व.२००७-०८ मधील कामकाजातील कामगिरी

### १.३.१.१ वीज निर्मिती

आ.व.२००७-०८ मधील टाटा पॉवर–जीची अंदाजित वीज निर्मिती पुढीलप्रमाणे आहे :

**तक्ता १-३: आ.व.२००७-०८ – एकूण वीज निर्मिती**

मि.यु.मध्ये

| वीज निर्मिती केंद्र | आयोगाने दिलेली मान्यता | आ.व.२००७-०८ (प्रत्यक्ष निर्मिती) | फरक |
|---|---|---|---|
| **जलविद्युत् केंद्रे** | | | |
| खोपोली | | २५८ | |
| भिवपुरी | | २८८ | |
| भिरा | | ९४३ | |
| **एकूण जलविद्युत् निर्मिती** | **१५००** | **१४८९** | **(११)** |
| **औष्णिक वीज निर्मिती** | | | |
| युनिट क्र.४ | ९३५ | ७९५ | (१४०) |
| युनिट क्र.५ | ३,९९५ | ४,००१ | ६ |
| युनिट क्र.६ | ३,८१६ | ३,८७० | ५४ |
| युनिट क्र.७ | १,४४० | १,३३७ | (१०३) |
| **एकूण औष्णिक वीज निर्मिती** | **१०,१८६** | **१०,००२** | **(१८४)** |

आ.व.२००७-०८ मधील जलविद्युत् निर्मिती १,४८९ मि.यु. इतकी, म्हणजे सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या निर्मितीच्या तुलनेत काही प्रमाणात कमी होती. औष्णिक वीज निर्मिती मान्यताप्राप्त निर्मितीच्या तुलनेत १.८ % इतक्या माफक प्रमाणात कमी होती. युनिट क्र.४ व युनिट क्र.७ मधून कमी वीज निर्मिती झाल्यामुळे टेरिफ ऑर्डरमधे मान्यता दिलेल्या निर्मितीपेक्षा ट्रॉम्बे पॉवर स्टेशन येथील वीज निर्मिती कमी होती.

### १.३.१.२ हीट रेट्स

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या मर्यादेतच युनिट क्र.४ आणि युनिट क्र.६ चे हीट रेट आहेत. स्टेशनचा एकूण हीट रेट मान्यताप्राप्त पातळीपेक्षा ०.१७% असा माफक प्रमाणात चांगला आहे. परंतु युनिट क्र.५ व युनिट क्र.७ च्या मान्यताप्राप्त आणि प्रत्यक्ष हीट रेट्समधे फरक आहे. विभाग ४.२.२ मध्ये या फरकाची कारणे नमूद करण्यात आली आहेत.

### १.३.१.३ ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन

टाटा पॉवर–जीने ट्रॉम्बे येथील सर्व युनिट्स आणि एकूणात देखील वीन निर्मितीच्या पर्यायांचे प्रत्यक्ष व्यवस्थापन आणि ऑक्झिलिअरी कन्झम्प्शनच्या नियंत्रणाद्वारे मान्यताप्राप्त ४.४१% च्या तुलनेत आपले ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन ४,०४ % इतके कमी राखले आहे. आ.व.२००७-०८ दरम्यान औष्णिक तसेच जल विद्युत् निर्मिती केंद्रे मान्यताप्राप्त मर्यादांमध्येच कार्यरत राहिली आहेत.

## १.३.२ आर्थिक कामगिरी – खर्च – आ.व.२००७-०८

### १.३.२.१ इंधन खर्च

र.२,९८६ कोटी या मान्यताप्राप्त मर्यादेच्या तुलनेत आ.व. २००७-०८ मधील एकूण इंधन खर्च र.३,३११ कोटी इतका झाला आहे. ही इंधन खर्चातील वाढ मान्यताप्राप्त मर्यादेपेक्षा प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कोळसा आणि इंधन तेलाच्या किमती वाढल्यामुळे झाली आहे. विशेषतः इंधन तेलाच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढल्याने मान्यताप्राप्त रु.१९,८८६/मे.टन या किमतीच्या तुलनेत प्रत्यक्षात ती रु.२५,१९३/मे.टन इतकी झाली . त्याचप्रमाणे कोळशाच्या मान्यताप्राप्त रु.२,८१४/मे.टन या किमतीच्या तुलनेत ती रु.२,९०७/मे.टन इतकी राहिली. कोळशावर आधारित वीज निर्मितीचे प्रमाण वाढवल्यामुळे इंधन खर्चातील या वाढीचा परिणाम काही प्रमाणात सामावून घेऊन कमी करता आला आहे, अन्यथा यामुळे रु.११५ कोटी इतका अतिरिक्त आर्थिक भार पडला असता याकडे लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

टाटा पॉवर–जीतर्फे वाढीस मान्यता देण्याची विनंती करण्यात येत असलेल्या युनिट क्र.५ आणि युनिट क्र.७ व्यतिरिक्त, मान्यताप्राप्त हीट रेट्स आणि ऑक्झिलिअरी कन्झम्प्शनच्या आधारे हिशोब करण्यात आलेला इंधन खर्च पुढीलप्रमाणे आहे :

**तक्ता १-४ः मान्यताप्राप्त मर्यादांवर आधारित इंधन खर्च – आ.व.२००७-०८**

| तपशील | | युनिट क्र.४ | युनिट क्र.५ | युनिट क्र.६ | युनिट क्र.७ | इंसआ आणि इतर जुळवणी | एकूण इंधन खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंधन खर्च (रुपये कोटीमध्ये) | अ | ४७६ | ६२६ | २,११६ | ९३ | - | ३,३११ |
| प्रत्यक्ष हीट रेट | ब | २,४९७ | २,५६७ | २,३०६ | २,००१ | | |
| प्रत्यक्ष ऑक्झी. कन्झ.(%) | क | ७.३९% | ४.८७% | ३.०७% | २.३७% | | |
| प्रत्यक्ष नक्त हीट रेट | ड = ब/(१-क) | २,६९७ | २,६९८ | २,३७९ | २,०५० | | |
| नॉर्मेटिव्ह हीट रेट | ई | २,५६५ | २,५६७ | २,४०० | २,००१ | | |
| नॉर्मेटिव्ह ऑक्झी.कन्झ. (%) | फ | ८.००% | ५.५०% | ३.५०% | २.७५% | | |
| नॉर्मेटिव्ह नक्त हीट रेट | ग = ई/(१-फ) | २,७८८ | २,७१६ | २,४८७ | २०५८ | | |
| **नॉर्मेटिव्ह नक्त हीट रेटनुसार इंधन खर्च (रु. कोटीमध्ये)** | **ह = ग/ड*अ** | **४९२** | **६३१** | **२,२१२** | **९३** | **-** | **३,४२८** |
| नक्त फायदा/(तोटा) | ऐ = ह – अ | १६ | ४ | ९६ | ० | - | ११६ |
| वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित | ज = १/३*ऐ | ५ | १ | ३२ | ० | - | ३९ |

टाटा पॉवर–जीच्या कार्यक्षम कामकाजामुळे वितरण परवानाधारकांना रु.३९ कोटी इतका नक्त फायदा झाला असल्याचे वरील तक्त्यावरुन निदर्शनास येईल.

### १.३.२.२ कामकाज आणि देखभाल खर्च

कामकाज अआणि देखभाल खर्चातील विविध घटक पुढील विभागांमधे स्पष्ट केले आहेत :

**कर्मचारीसंबंधित खर्च**

कर्मचारीसंबंधित खर्चाच्या आ.व.२००६-०७ मधील प्रत्यक्ष खर्चाच्या रु.१०६ कोटीच्या तुलनेत आ.व.२००७-०८ मध्ये रु.१३१ कोटी खर्च झाले. आ.व.२००७-०८ च्या कर्मचारीसंबंधित खर्चात कायद्याच्या तरतुदीप्रमाणे एएस १५ (आर) करिता आवश्यक

असलेल्या रु.२४ कोटींचाही समावेश आहे. आ.व.२००६-०७ च्या मूळ पातळीच्या तुलनेत वाढलेली महागाई पाहता, खर्चाची रु.१३१ कोटीची रक्कम रास्त स्वरुपाची आहे.

**व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च**

आ.व.२००७-०८ चा व्यवस्थापन आणि सर्वसाधारण खर्च ब्रँड इक्विटीसाठीचा खर्च वजा जाता रु.६८ कोटी असून तो सन्माननीय आयोगाच्या मान्यतेनुसार आहे. ब्रँड इक्विटीच्या खर्चास मान्यता न देण्याच्या सन्माननीय आयोगाच्या धोरणासंदर्भात टाटा पॉवर–जीने एटीई मध्ये अपील केले असल्याकारणाने, एटीईच्या निर्णयाच्या आधारे खर्चाच्या रकमेत योग्य त्या स्वरुपाचे बदल करण्याचा आपला हक्क टाटा पॉवर–जी राखून ठेवत आहे.

**दुरुस्ती आणि देखभाल खर्च**

आ.व.२००७-०८चा दुरुस्ती आणि देखभाल खर्च रु.१०३ कोटी इतका आहे.

**१.३.२.३ एकूण कामकाज आणि देखभालीचा एकत्रित खर्च**

आ.व.२००७-०८ चा कामकाज आणि देखभालीचा खर्च रु.३१० कोटी असून त्यामे ब्रँड इक्विटी आणि ब्रँड प्रमोशनसंबंधातील खर्चांचा समावेश आहे. सन्माननीय आयोगाने या खर्चास मान्यता दिली नसल्यामुळे आ.व.२००७-०८ साठी तात्पुरत्या सत्य-पडताळ्यादरम्यान सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.३१३ कोटीच्या तुलनेत एकूण कामकाज आणि देखभाल खर्च ब्रँड इक्विटी आणि ब्रँड प्रमोशनवरील खर्च वजा जाता रु.३०१ कोटी इतका आहे.

आ.व.२००७-०८ साठी तात्पुरत्या सत्य-पडताळ्यादरम्यान सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या खर्चाच्या तुलनेत एकूण खर्च कमी आहे  असे लक्षात घेण्याची आम्ही विनंती करतो. ब्रँड इक्विटीसंदर्भातील खर्च रु.९ कोटी असून २ एप्रिल २००८ च्या आदेशान्वये सन्माननीय आयोगाने या खर्चास मान्यता नाकारली आहे.

**१.३.२.४ अवमूल्यन**

(आर्थिक वर्षादरम्यान वाढलेल्या मालमत्तेसंदर्भातील अवमूल्यनाचा घटक वजा केल्यानंतर) आ.व.२००७-०८ साठीचे अवमूल्यन सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या अंदाजित रु.४८ कोटीच्या तुलनेत रु.४८ कोटी इतके आहे.

सन्माननीय आयोगाने त्यांच्या यापूर्वीच्या आदेशान्वये स्वीकारलेल्या तत्वांनुसार अवमूल्यनाचा हिशोब केला असला तरी त्याविरुध्द टाटा पॉवर–जीने एटीईकडे दाद मागितली आहे असे टाटा पॉवर–जी नम्रपणे नमूद करु इच्छिते.

**१.३.२.५ व्याज आणि फायनान्स चार्जेस**

पुढील तीन सदरांच्या आधारे व्याजासंबंधीच्या खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे, (१) कर्जावरील व्याज (२) वर्किंग कॅपिटलवरील व्याज आणि (३) फायनान्स चार्जेसवरील व्याज

**कर्जावरील व्याज**

गत वर्षांच्या नॉर्मेटिव्ह लोन्सवरील (आ.व.२००३-०४ करिता भांडवली खर्चाच्या ७० % आणि आ.व.२००४-०५, आ.व.२००५-०६ व आ.व.२००६-०७ करिता भांडवलीकरणाच्या ७० %) व्याजाव्यतिरिक्त आ.व.२००७-०८ करिता व्याज आणि फायनान्स चार्जेसचा हिशोब आ.व.२००७-०८ दरम्यान भांडवलीकरण करण्यात येत असलेल्या भांडवली खर्चाच्या आधारे केला आहे. टाटा पॉवरने आपल्या भांडवली खर्चासाठी आयडीएफसीकडून रु.४५० कोटीचे कर्ज खालील अटींवर घेतले आहे :

---

| | |
|---|---|
| मुदत : | ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे |
| परतफेड : | रु.५.६५ कोटीचे ३५ तिमाही हप्ते आणि ३६ वा हप्ता रु.२५२.२५ कोटींचा, या स्वरुपात परतफेड |
| व्याज दर : | व्याजदर पुनर्निश्चितीच्या तारखेपूर्वी ६ महिने कंपनीचे मूल्यांकन 'एएए ' असल्यास बेंचमार्क दर (५ वर्ष जी–सेक दर) + १.४५% प्रतिवर्ष (दरमहा देय)<br>(किमान ८.९०% च्या मर्यादेत)<br>'एएए ' असे मूल्यांकन राखणे कंपनीस शक्य न झाल्यास, मुदतीचा पुनर्विचार करण्याचा हक्क आयडीएफसीकडे राहील. |

---

वरील मुद्दे विचारात घेऊन आ.व.२००७-०८ साठीचा व्याज दर ८.९०% इतका गृहीत धरला आहे आणि सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.२३ कोटींच्या तुलनेत आ.व.२००७-०८ करिता व्याजापोटीच्या खर्चाचा हिशोब रु.२० कोटी इतका येत आहे. वर उल्लेख केलेल्या कर्जांच्या अटी बहुवर्षीय टेरिफ ऑर्डरद्वारे मान्यताप्राप्त आहेत याची नोंद घ्यावी अशी विनंती आहे.

**वर्किंग कॅपिटलवरील व्याज**

सन्माननीय आयोगाच्या टेरिफविषयक नियमनाद्वारे निर्देशित केलेल्या घटकांच्या आधारे वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा हिशोब केला आहे.

टेरिफ नियमनांमधे निर्देशित केल्यानुसार आ.व.२००७-०८ करिता वर्किंग कॅपिटलवरील व्याजाच्या हिशोबाचा अंदाज करण्यासाठी ११.५% (टेरिफ अर्ज सादर करण्याच्या दिवशीचा एसबीआय पीएलआर) हा दर गृहीत धरण्यात आला आहे. परंतु आ.व. २००७-०८ मध्ये हा दर प्रत्यक्षात १२.२५ % असल्याची माहिती सन्माननीय आयोगास अवगत करण्याची टाटा पॉवर–जी इच्छा व्यक्त करते.

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.८९ कोटीच्या तुलनेत टाटा पॉवर-जीचा आ.व.२००७-०८ मधील वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीचा खर्च रु.८७ कोटी येत आहे.

टाटा पॉवर–जीच्या वर्किंग कॅपिटलसाठी लागणाऱ्या प्रत्यक्ष रकमांची तरतूद प्रत्यक्ष कर्जे आणि इंटर्नल ॲक्रुअल्सच्या माध्यमातून कॉर्पोरेटने पुरवलेल्या रकमांद्वारे केली आहे. आ.व.२००७-०८ साठीचा वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीचा प्रत्यक्ष खर्च रु.२६ कोटी इतका आहे. टाटा पॉवरच्या मुंबईतील व्यवसाय-कामकाजातील एकूण नॉर्मेटिव्ह वर्किंग कॅपिटलमधील टाटा पॉवर–जीचा नॉर्मेटिव्ह वर्किंग कॅपिटलमधील हिस्सा लक्षात घेऊन त्या आधारे टाटा पॉवर–जीचा हिस्सा रु.२२ कोटी इतका येतो.

(इंटर्नल ॲक्रुअल्ससारख्या) कॉर्पोरेट फंडांच्या माध्यमातून उभ्या केलेल्या आर्थिक मदतीमुळे ही रोख रक्कम पैसा–बाजारात गुंतवून त्यावर उत्पन्न कमावण्याची संधी नाकारली जात असल्याने कॉर्पोरेटला अशा स्वरुपाच्या 'इंटर्नल कॅश' किंवा रकमांवर ती त्या स्वरुपात राखण्याचा खर्च (कॅरीइंग कॉस्ट) येतो त्यामुळे व्याज लागू करण्यासाठी अशा स्वरुपात पुरवलेली आर्थिक मदतदेखील पात्र ठरते याची कृपया नोंद घेणे आवश्यक आहे. म्हणजेच वर्किंग कॅपिटलमध्ये आपला पैसा (रोख रक्कम) गुंतवून ठेवून टाटा पॉवर–जीने व्याजापोटीच्या परिणामी खर्चाची जबाबदारी घेतली आहे असे म्हणता येते.

कामकाज चालू असलेल्या कोणत्याही कंपनीला ते चालू ठेवण्यासाठी वर्किंग कॅपिटलची गरज असते हे सर्वमान्य आहे. अशा वर्किंग कॅपिटलची गरज कर्जाद्वारे किंवा स्वतःच्याच अर्थसंचयातून केली जाऊ शकते. कर्जाद्वारे अशी रक्कम उभी केल्यास कर्ज देणाऱ्यास दिलेल्या व्याजाचा खर्च उभा राहतो. परंतु असे कर्ज न घेतल्यास अशा अर्थबळाची तरतूद कंपनीला आपल्याच अर्थसंचयातून करावी लागते. अशा स्वरुपाचे आर्थिक पाठबळ हे भागधारकांद्वारे पुरवले जाते आणि त्यावर परतावा मिळण्याची

त्यांची अपेक्षा असते. त्यामुळे अशा अंतर्गत व्यवस्थेतून वर्किंग कॅपिटलसाठी उभ्या केलेल्या रकमांवरही काही खर्च येईल असे गृहीत धरणे कायद्याला धरुन आणि रास्तच असते. खरे तर भागधारकांची परताव्याची अपेक्षा लादल्या गेलेल्या अशा अंतर्गत व्यवस्थेतून उभारलेल्या अर्थबळासाठीचा खर्च सर्वसाधारणपणे घेतलेल्या कर्जासाठीच्या खर्चापेक्षा जास्त असतो. म्हणूनच प्रत्यक्षात जरी कोणतीही रक्कम कर्जाऊ घेतली गेली नसली, तरी वर्किंग कॅपिटलवरील संपूर्ण नॉर्मेटिव्ह व्याज हे ‘इफीशियन्सी गेन’ सदरात मोडणारे असून ते ग्राहकांना वाटून दिले पाहिजे असे तात्पर्य काढणे चुकीचे ठरेल.

टेरिफ नियमनांमध्येदेखील वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा हिशोब ‘नॉर्मेटिव्ह बेसिस’वर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले असून वर्किंग कॅपिटलसाठीची आर्थिक व्यवस्था प्रत्यक्ष कर्जातूनच उभारली जावी अशा प्रकारची कोणतीही पूर्व-अट नियमनांमध्ये घालण्यात किंवा निर्देशिण्यात आलेली नाही हे इथे आम्ही नमूद करतो. तसेच भांडवली खर्चासाठी घेण्यात येणाऱ्या नॉर्मेटिव्ह कर्जांसाठी लागू केली जाणारी पध्दतच वर्किंग कॅपिटलसाठी आर्थिक तरतूद करण्याच्या बाबतीतही लागू केली जावी अशी आम्ही विनंती करतो.

वरील मुद्दे विचारात घेऊन, वर्किंग कॅपिटलच्या प्रत्यक्ष आवश्यक रकमेवरील नॉर्मेटिव्ह व्याजदराने (एसबीआय पीएलआर) येणाऱ्या व्याजाच्या रकमेचा समावेश व्याजापोटीच्या खर्चात करण्यात यावा अशी आम्ही विनंती करतो. आ.व.२००७-०८ चा प्रत्यक्ष वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा खर्च रु.१०८ कोटी इतका येतो. ॲनेक्शर – २ : प्रत्यक्ष वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा खर्च या शीर्षकाखाली वर्किंग कॅपिटलवरील व्याजाच्या खर्चाचा हिशोब दाखविला आहे.

सन्माननीय आयोगाने २ एप्रिल २००८ रोजी दिलेल्या टेरिफ आदेशाद्वारे निर्देशित केलेल्या धोरणाचा, दृष्टिकोनाचा पुनर्विचार करावा आणि वर्किंग कॅपिटलसहित फायदा आणि तोट्याचा हिशोब करताना वरील पध्दतीचा उपयोग करण्यास मान्यता द्यावी अशी नम्र विनंती आम्ही आयोगास करत आहोत.

**फायनान्स चार्जेस**

या वर्षासाठीचे फायनान्स चार्जेस रु. (३) कोटी इतके आहेत. आतंतराष्ट्रीय चलन–दरामधे कंपनीसाठी फायदेशीर स्वरुपाचे बदल झाल्यामुळे हे घडले आहे. यामुळे आ.व.२००७-०८ करिता टाटा पॉवर–जीची अंदाजित वार्षिक महसुलाची आवश्यकता कमी होणार आहे.

**१.३.२.६ इक्विटीवरील परतावा**

भांडवलीकृत खर्च आणि डेटःइक्विटीची ७०:३० अशी प्रमाणपध्दत याच्या आधारे आलेली इक्विटी आणि त्यावरील १४ % परताव्याची आ.व. २००७-०८ साठीची रक्कम परताव्याच्या मान्यताप्राप्त रु.१५२ कोटींच्या तुलनेत रु.१५२ कोटी इतकी आहे.

**१.३.२.७ आयकर**

आयकर कायद्याच्या विविध कलमांमधील तरतुदी, कलम ३२, कलम ४३अ, ४३ब, कलम ८० आयए, कलम १४ आणि इतर संबंधित कलमांमधील सवलती आणि मर्यादा/बंधने यांचा विचार करुन टाटा पॉवर–जीचा स्वतंत्रपणे हिशोब करण्यात आलेला आ.व.२००७-०८ साठीचा आयकर सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.४४ कोटींच्या तुलनेत रु.१२० कोटी इतका येतो.

सन २००७ मधील दावा क्र.६४, ६५ आणि ६६च्या संदर्भात सन्माननीय आयोगाचे आदेश असे आहेत :

> “ कर्जावरील तसेच वर्किंग कॅपिटलवरील नॉर्मेटिव्ह व्याज हे प्रत्यक्ष खर्च नाहीत आणि म्हणूनच, आयकराचा हिशोब करताना अशा स्वरुपाचे खर्च करपात्र उत्पन्नातून वजा करण्यास पात्र ठरत नाहीत, या आरईएलच्या दाव्याशी आयोग सहमत आहे. “

कराच्या रकमांचा हिशोब करताना टाटा पॉवर–जीने या आदेशांचा विचार अनुस्यूत केला आहे.

### १.३.२.८ भांडवली खर्च

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.१७५ कोटींच्या तुलनेत आ.व.२००७-०८चा एकूण भांडवली खर्च रु.१५९ कोटी इतका आहे.

### १.३.२.९ नॉन-टेरिफ इन्कम

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.१० कोटींच्या तुलनेत आ.व.२००७-०८चा एकूण नॉन-टेरिफ इनकम रु.२७ कोटी इतका आहे.

### १.३.३ आ.व. २००७-०८ साठीचे ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस

वर उल्लेख केलेल्या खर्चाच्या सदरांच्या आधारे, आ.व.२००७-०८ करिता टाटा पॉवर–जीच्या प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित सुधारित वार्षिक महसुली आवश्यकतेचे (ॲन्युअल रेव्हेन्यू रिक्वायरमेंटचे) स्वरुप खाली दिले आहे :

**तक्ता १-५: आ.व.२००७-०८ – सुधारित ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस**

रु.कोटीमधे

| तपशील | आयोगाची मान्यता | आ.व.२००७-०८ करिता (प्रत्यक्ष) | फरक |
|---|---|---|---|
| कामकाज व देखभाल खर्च | ३१३ | ३०१ | (१२) |
| दीर्घ मुदतीच्या कर्जांवरील व्याज | २३ | २० | (२) |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा खर्च | ८९ | ८७ | (२) |
| फायनान्स चार्जेसवरील व्याजाचा खर्च | - | (३) | (३) |
| अवमूल्यन | ४८ | ४८ | (०) |
| आयकर | ४४ | १२० | ७६ |
| एकूण फिक्स्ड खर्च | ५१७ | ५७४ | ५७ |
| इक्विटीवरील परतावा | १५२ | १५२ | (०) |
| वजा : नॉन-टेरिफ इन्कम | १० | २७ | १७ |
| वार्षिक फिक्स्ड चार्जेस (खर्च) | ६५९ | ६९९ | ४० |

टाटा पॉवर–जीने उपलब्धता आणि क्षमतेचे प्रमाण नॉर्मेटिव्ह लेव्हल्सपेक्षा भरपूर जास्त साधल्यामुळे ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस पूर्णपणे वसूल करण्यास पात्र आहे.

### आ.व.२००७-०८ मधील फायदा आणि तोट्याचे विभाजन

फायदा आणि तोट्याच्या विभाजनासाठी सन्माननीय आयोगाने टेरिफ नियमनांमध्ये एक पध्दत मान्य केलेली आहे. टाटा पॉवर–जीने या अर्जात खर्चाच्या विविध सदरांखाली प्रत्यक्ष खर्च दाखवलेला असून फरकासंबंधीचे स्पष्टीकरणही दिले आहे. या भागात खर्चाची विविध सदरे (१) नियंत्रण करणे शक्य असलेला खर्च आणि (२) नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च अशा मुख्य दोन प्रकारात विभाजित केली आहेत. विभाजनानंतर नियंत्रण करणे शक्य असलेल्या खर्चासंबंधातील फायदा आणि

तोट्याचा हिशोब करण्यात आला आहे आणि त्याचे वितरण परवानाधारक आणि टाटा पॉवर–जीदरम्यानचे विभाजन सन्माननीय आयोगाच्या विचारार्थ सादर केले आहे. तक्ता ४-२५ मधे विविध सदरांखालील खर्चाबद्दलचा विचार मांडला आहे.

वरील वर्गीकरण आणि त्याच्या कारणांच्या आधारे विभाजनासाठीच्या फायदा आणि तोट्याचे प्रमाण पुढे दर्शविण्यात आले आहे :

**१.३.४.१ इंधन खर्च**

वीज निर्मिती संचांच्या कामकाजासंबंधीच्या निकषांमुळे इंधन खर्चातील बदल हे नियंत्रण करणे शक्य असलेल्या स्वरुपाचे समजले जावेत. (यांच्यासंदर्भात प्रत्यक्ष हीट रेट्सचा विचार केला असल्याने) युनिट क्र.५ आणि युनिट क्र.७ व्यतिरिक्त विविध नॉर्मेटिव्ह निकषांनुसार एकूण इंधन खर्च, फायदा आणि वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित केलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे :

**तक्ता १-६: आ.व.२००७-०८ – इंधन खर्चातील फरकामुळे झालेला फायदा आणि तोटा**

रु. कोटीमधे

| तपशील | | युनिट क्र.४ | युनिट क्र.५ | युनिट क्र.६ | युनिट क्र.७ | इंसआ आणि इतर जुळवणी | एकूण इंधन खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंधन खर्च (रुपये कोटीमध्ये) | अ | ४७६ | ६२६ | २,११६ | ९३ | - | ३,३११ |
| प्रत्यक्ष हीट रेट | ब | २,४९७ | २,५६७ | २,३०६ | २,००१ | | |
| प्रत्यक्ष ऑक्झी. कन्झ.(%) | क | ७.३९% | ४.८७% | ३.०७% | २.३७% | | |
| प्रत्यक्ष नक्त हीट रेट | ड = ब(१-क) | २,६९७ | २,६९८ | २,३७९ | २,०५० | | |
| नॉर्मेटिव्ह हीट रेट | ई | २,५६५ | २,५६७ | २,४०० | २,००१ | | |
| नॉर्मेटिव्ह ऑक्झी.कन्झ. (%) | फ | ८.००% | ५.५०% | ३.५०% | २.७५% | | |
| नॉर्मेटिव्ह नक्त हीट रेट | ग = ई/(१-फ) | २,७८८ | २,७१६ | २,४८७ | २०५८ | | |
| **नॉर्मेटिव्ह नक्त हीट रेटनुसार इंधन खर्च (रु. कोटीमध्ये)** | **ह = ग/ड*अ** | **४९२** | **६३१** | **२,२१२** | **९३** | **-** | **३,४२८** |
| नक्त फायदा/(तोटा) | ऐ = ह – अ | १६ | ४ | ९६ | ० | - | ११६ |
| वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित | ज = १/३*ऐ | ५ | १ | ३२ | ० | - | ३९ |

टाटा पॉवर–जीने रु.३९ कोटी इतकी नक्त बचत वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित केली असल्याचे वरील तक्त्यावरुन निदर्शनास येईल.

**१.३.४.२ कामकाज व देखभाल खर्च**

कामकाज व देखभालीसंदर्भात भाग ४.२ मधे दर्शविल्यानुसार नियंत्रण करणे शक्य नसलेल्या विविध घटकांमुळे आ.व.२००७-०८ साठीच्या खर्चात वाढ झाली आहे.

**तक्ता १-७: आ.व.२००७-०८ – कामकाज व देखभालीच्या खर्चातील फरकामुळे झालेला फायदा आणि तोटा**

| अनुक्र. | तपशील | रु. कोटीमध्ये |
|---|---|---|
| १ | आ.व.२००७-०८ करिता मान्यताप्राप्त कामकाज व देखभाल खर्च | ३१३ |
| २ | ब्रँड इक्विटी वगळून प्रत्यक्ष कामकाज व देखभाल खर्च | ३०१ |
| ३ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | ५ |
| | पाणी आकार | २ |
| | आयटी इन्फ्रास्ट्रक्चरचा दर्जा-स्तर सुधारणे | ४ |
| ४ | नियंत्रण करणे शक्य नसलेल्या खर्चाव्यतिरिक्तचा प्रत्यक्ष खर्च (२ – ३) | २९६ |
| ५ | - वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | ६ |
| ६ | टाटा पॉवर–जीने राखून ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली रक्कम | ११ |
| ७ | नक्त पात्रता (३) + (४) + (६) | ३१३ |

वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित करण्यात येत असलेली फायदा आणि तोट्याची रक्कम रु.६ कोटी आहे.

### १.३.४.३ वर्किंग कॅपिटलवरील व्याज

२ एप्रिल २००८ च्या आदेशान्वये सन्माननीय आयोगाने प्रत्यक्ष वर्किंग कॅपिटलचा विचार केला आणि त्यास फायदा म्हणून मान्यता देऊन त्यापैकी १/३ हिस्सा वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित केला. सन्माननीय आयोगाच्या या आदेशात वापरलेल्या हिशोब-पध्दतीविरुध्द, कॉर्पोरेटकडे उपलब्ध असलेल्या पैशांमधून वर्किंग कॅपिटलची उभारणी केली असली तरी त्यासाठीही काही किंमत मोजावी लागते या मुद्याच्या आधारे टाटा पॉवर–जीने एटीईकडे दाद मागितली आहे.

**तक्ता १-८: आ.व.२००७-०८ – वर्किंग कॅपिटलमधील खर्चातील फरकामुळे झालेला फायदा आणि तोटा**

| अनुक्र. | तपशील | रु. कोटीमधे |
|---|---|---|
| १ | मान्यताप्राप्त पध्दतीनुसार वर्किंग कॅपिटलवरील नॉर्मेटिव्ह व्याज | ८७ |
| २ | वर्किंग कॅपिटलवरील प्रत्यक्ष व्याज | १०८ |
| ३ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | |
| ४ | नियंत्रण करणे शक्य नसलेल्या खर्चाव्यतिरिक्तचा प्रत्यक्ष खर्च (२ – ३) | १०८ |
| ५ | - वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | (७) |
| ६ | टाटा पॉवर–जी कडे राखीव | (१४) |
| **७** | **नक्त पात्रता (३)+(४)+(६)** | **९४** |

एटीईच्या निर्णयानुसार खर्चाच्या रकमांमधे बदल करण्याचा आपला हक्क टाटा पॉवर–जी राखून ठेवत आहे.

### १.३.५ वीज पुरवठ्यातून महसूल

वितरण परवानाधारकांना केलेल्या वीज पुरवठ्यातून आलेला टाटा पॉवर-जीचा महसूल खालीलप्रमाणे :

तक्ता १-९: आ.व.२००७-०८ – वीज निर्मिती व्यवसायातून आलेला महसूल

| अनुक्र. | तपशील | एकक | बीईएसटी | आरईएल/ आरइन्फ्रा | टाटा पॉवर–डी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिक्स्ड चार्ज | रु. कोटीमधे | १८२ | २१२ | १०० | ४९४ |
| २ | इन्सेन्टिव्ह | रु. कोटीमधे | १५ | १८ | ८ | ४१ |
| ३ | हायड्रो रिबेट | रु. कोटीमधे | (२७) | (३१) | (१५) | (७२) |
| | | | | | | |
| ४ | एनर्जी रेट | रु./केडब्ल्यूएच | ३ | ३ | ३ | ३ |
| ५ | एनर्जी सोल्ड | मि.यु. | ४,०८६ | ४,७४८ | २,२४६ | ११,०८० |
| ६ | एनर्जी चार्ज | रु. कोटीमधे | १,३५५ | १,५७४ | ७४५ | ३,६७४ |
| ७ | रोखीची सवलत / पूर्वीच्या मुद्यांसाठी समायोजन | रु. कोटीमधे | (११) | ३ | | (७) |
| ८ | **एकूण = १+२+३+६+७** | **रु. कोटीमधे** | **१,५१५** | **१,७७६** | **८३९** | **४,१३०** |

### १.३.६ कराच्या रकमेची फेरपरती

कलम ८० आयएद्वारे आणि इतर अनुकूल निर्णयांद्वारे मिळणारे फायदे विचारात घेऊन) आ.व.२००७-०८ चा एपीआर अर्ज सादर करताना टाटा पॉवरने आ.व.१९८३-८४ पासून पुढच्या विविध वर्षांसाठी यशस्वीपणे मिळवलेल्या कराच्या रकमेच्या फेरपरतीविषयी चर्चा केली होती हे सन्माननीय आयोगास विदीत आहे. सादर केलेल्या अर्जाद्वारे हा फायदा वितरण परवानाधारकांना हस्तांतरितदेखील केला होता. या फेरपरतीतून निर्माण झालेल्या फायद्याबद्दल सन्माननीय आयोगाने आपल्या ४ जून २००८ च्या आदेशाद्वारे आ.व.२००२-०३ पर्यंतच्या कालावधीचा विचार केला होता. आ.व.२००३-०४ पासून पुढच्या काळासाठी अपेलेट ट्रिब्यूनलच्या निकालाच्या परिणामांसमवेत आगामी काळातील अर्ज सादर करताना विचार करावा असे सन्माननीय आयोगाने सुचविले होते. या भागाद्वारे टाटा पॉवर–जी आ.व.२००३-०४ पासून पुढच्या काळातील अशा स्वरुपाच्या ग्राहकांना हस्तांतरित करावयाच्या फायद्याचा हिशोब सादर करत आहे. पुढील अतिरिक्त मुद्यांचाही विचार व्हावा अशी विनंती आहे :

- एटीई चा निकाल आ.व.२००४-०५ व आ.व.२००५-०६ संदर्भात होता. त्यामुळे या निकालामुळे आ.व.२००३-०४ च्या हिशोबावर काही परिणाम होणार नाही;
- आ.व.२००७-०८ मधे कलम ८० आयएवर आधारित हिशोबातून आणखी काही कर फेरपरतीचे फायदे मिळाले आहेत. असे फायदेदेखील वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत.
- आ.व.२००६-०७ करिता इलेक्ट्रिसिटी (सप्लाय) ॲक्ट १९४८च्या शेड्यूल सहाची तत्वे लागू आहेत.

खालील तक्त्यात ग्राहकांकडे हस्तांतरित करावयाच्या फायद्याचा हिशोब केला आहे :

### तक्ता १-१०: आ.व.२००७-०८ – वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेल्या कर फेरपरतीचा तपशील

रु. कोटीमधे

| | | आ.व. २००३-०४ | आ.व. २००४-०५ | आ.व. २००५-०६ | आ.व. २००६-०७ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | आ.व.१९८३-८४ पासून पुढील काळासाठी आव.०८च्या एपीआरमधे दाखवलेला कर फेरपरतीचा फायदा | ४२ | ३१ | ३० | | |
| (२) | या आ.व.०९च्या एपीआरमधे दाखवलेला कर फेरपरतीचा अतिरिक्त फायदा | ६ | ८ | १२ | १ | |
| (३)=(१)+(२) | एकूण | ४८ | ३९ | ४२ | १ | |
| (४) | प्रत्यक्ष खर्चावर आधारुन टाटा पॉवरने आपल्या अर्जात दाखविलेली कराची रक्कम | २२४ | १३८ | १६० | | |
| (५)=(४)-(३) | संदर्भित वर्षांमधे योग्य ती जुळवणी झाली असता जी कराची रक्कम आली असती ती रक्कम | १७६ | ९९ | ११८ | | |
| (६) | टाटा पॉवरसंदर्भात सन्माननीय आयोगाने टेरिफविषयक आदेशानुसार मान्यता दिलेली कराची रक्कम | १२८ | १०५ | ११० | | |
| (७) | एटीईच्या निकालामुळे पुनःस्थापित केलेली कराची रक्कम | | ३३ | ५० | | |
| (८)=(६)+(७) | मान्यता मिळवण्यासाठी विनंती केलेली (पुनःस्थापित रकमेसह) एकूण रक्कम | १२८ | १३८ | १६० | | |
| (५) | कर फेरपरतीमुळे आरआरच्या तुलनेत ज्या प्रमाणात सीपी मर्यादेबाहेर गेली असती ती रक्कम = जर (८) हा (५) पेक्षा जास्त असेल तर (८) वजा (५) अन्यथा शून्य | - | ३९ | ४२ | | |
| (६) = (५) चा १/३ हिस्सा | ईएसए ॲक्ट १९४८ च्या सहाव्या शेड्यूलमधील तरतुदींचा अवलंब करुन अतिरिक्त रकमेपैकी टी ॲंड डी रिझर्वमधे जमा रक्कम | - | १३ | १४ | | |
| (७) = (५) चा १/३ हिस्सा | ईएसए ॲक्ट १९४८ च्या सहाव्या शेड्यूलमधील तरतुदींचा अवलंब करुन (५) मधील रकमेपैकी ग्रहकांच्या वाट्याची रक्कम | - | १३ | १४ | १ | २८ |

वरील हिशोबानुसार आ.व.२००७-०८ करिता फरक / फायद्याचा हिशोब करताना समावेश केलेली रु.२८ कोटी इतकी रक्कम वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित केली जाईल.

**आ.व.२००७-०८ करिता नक्त वार्षिक महसूल आवश्यकता आणि फरक**

आ.व.२००७-०८ करिता फायदा आणि तोट्याच्या विभाजनानुसार केलेल्या जुळवणीसह खर्चाचा तपशील सारांशरुपाने पुढील प्रमाणे :

**तक्ता १-११: आ.व.२००७-०८ – वार्षिक महसूल आवश्यकता**

| | | आ.व २००७-०८ | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्र. | तपशील | मान्यताप्राप्त | नियमनानुसार पात्रता | नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांद्वारे आलेले इफिशियन्सी गेन्स/लॉस | नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांद्वारे आलेल्या इफिशियन्सी गेन्स/लॉसच्या जुळवणीनंतरची (रिझर्वज्मधे केलेल्या जमेसह) नक्त पात्रता |
| एक | **महसूल** | | | | **४,१५७** |
| | - वीज पुरवठा | | | | ४,१३० |
| | - नॉन – टेरिफ इन्कम | १० | | | २७ |
| | | | | | |
| दोन | **खर्च** | | | | |
| १ | इंधन संबंधित खर्च | २,९८६ | ३,४२८ | ३९ | ३,३८९ |
| २ | कामकाज व देखभाल खर्च | ३१३ | ३१८ | ६ | ३१३ |
| ३ | अवमूल्यनासंदर्भातील अग्रिम हप्त्यासह अवमूल्यन, | ४८ | ४८ | | ४८ |
| ४ | दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज | २३ | २० | | २० |
| ५ | वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ८९ | ८७ | (७) | ९४ |
| ६ | इतर फायनान्स चार्जेस | - | (३) | | (३) |
| ७ | आयकर | ४४ | १२० | | १२० |
| ८ | इक्विटीवरील परतावा | १५२ | १५२ | | १५२ |
| ९ | **एकूण खर्च** | **३,६५५** | **४,१७०** | **३७** | **४,१३३** |
| १० | इन्सेन्टिव्ह | | ४१ | | ४१ |
| ११ | **इन्सेन्टिव्हसह एकूण** | | **४,२११** | | **४,१७४** |
| | | | | | |
| तीन | फरक / (फायदा) | | | | १७ |
| चार | **कर फेरपरतीचा परिणाम** | | | | (२८) |
| पाच | **अधिक एक्सेस रिकव्हरी – टीपीसी–डीसंदर्भातील ४ जून ०८च्या आदेशाच्या १०६ पैकी ४० वे पान** | | | | (४६) |
| सहा | **नक्त फरक / (फायदा)** | | | | (५७) |

वरील तक्त्यात दाखवलेल्या आ.व.२००७-०८ साठीच्या पात्रतेस व त्यातून उद्‌भवणाऱ्या महसूल आणि फरक/फायद्यास मान्यता देण्याची सन्माननीय आयोगास नम्र विनंती आहे.

## १.३.७ फायदा / फरकाचे विभाजन

वर उल्लेख केलेला फायदा / फरक फिक्स्ड कॉस्ट्स किंवा टाटा पॉवर-जीच्या निर्मिती क्षमतेच्या विभाजनानुसार करण्याचा टाटा पॉवर–जीचा प्रस्ताव आहे. प्रत्येक वितरण परवानाधारकाचा हिस्सा पुढीलप्रमाणे :

**तक्ता १-१२: आ.व. २००७-०८ – फायदा / फरकाचे विभाजन**

| वितरण परवानाधारक | फायदा/फरकाचा हिस्सा = टाटा पॉवर-जीच्या निर्मिती क्षमतेतील हिस्सा | फायदा/फरकाचा हिस्सा (रु. कोटीमधे) |
|---|---|---|
| बीईएसटी | ३६.८८% | (२१) |
| आरइन्फ्रा | ४२.८५% | (२४) |
| टाटा पॉवर – डी | २०.२७ % | (११) |
| एकूण | १००.०० % | (५७) |

फायद्याची वर दाखवलेली विभागणी कॅरीइंग कॉस्टचा विचार न करता सादर केली आहे. प्रकरण ७ मध्ये आ.व.२००७-०८ चा कॅरीइंग कॉस्टसहित (उणे) फायदा आणि प्रत्येक वितरण परवानाधारकाचा हिस्सा सादर केला आहे. हा फायदा (कॅरीइंग कॉस्टसह) बीईएसटी, आरइन्फ्रा आणि टाटा पॉवर–डी या तीन वितरण परवानाधारकांमध्ये विभाजित करण्याची परवानगी देण्याची टाटा पॉवर–जी सन्माननीय आयोगास विनंती करत आहे.

## १.४ ॲपेलेट ट्रिब्यूनल फॉर इलेक्ट्रिसिटी (एटीई) चे १२ मे २००८ चे निकालपत्र

आ.व.२००६-०७ करिता टेरिफ आदेश ३ ऑक्टोबर २००६ रोजी देण्यात आला. या आदेशाद्वारे सन्माननीय आयोगाने आ.व.२००४-०५ आणि आ.व.२००५-०६ च्या खर्चाचा सत्य पडताळा केला होता. सन्माननीय आयोगाने या दोन वर्षांच्या खर्चातील वेगवेगळ्या सदरांमधील काही रक्कम खर्चात धरण्याचे नाकारले होते. मग टाटा पॉवरने या टेरिफ आदेशाविरुध्द सन्माननीय आयोगाकडे पुनर्विचारासाठी अर्ज केला होता.

सन्माननीय आयोगाने ३ ऑक्टोबर २००६ च्या टेरिफ आदेशातील आपले निर्णय (एका मुद्याव्यतिरिक्त इतर मुद्यांवर) कायम ठेवत पुनर्विचार अर्जावरील आपला आदेश २२ मार्च २००८ रोजी दिला होता. त्यानंतर सन्माननीय आयोगाच्या २२ मार्च २००८च्या या आदेशाविरुध्द टाटा पॉवरने सन्माननीय ॲपेलेट ट्रिब्यूनल फॉर इलेक्ट्रिसिटी (एटीई) कडे अपील दाखल केले.

या संदर्भात एटीईने १२ मे २००८ रोजी आदेश जारी केला. एटीईने टाटा पॉवरच्या अपीलास परवानगी दिली आहे. एटीईच्या आदेशाच्या परिणामस्वरुपी, पूर्वी परवानगी न देण्यात आलेल्या खर्चाच्या रकमांची वसुली करण्याचा टाटा पॉवरला हक्क आहे.

या एटीईच्या आदेशात विविध मुद्यांचा विचार केला गेला आहे आणि एटीईच्या आदेशानंतर वसुली करण्याचा टाटा पॉवरला हक्क असलेल्या रकमा पुढीलप्रमाणे आहेत :

- अवमूल्यन
- आयकर
- कर्मचारीसंबंधित खर्च
- व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्च
- दुरुस्ती व देखभाल खर्च
- स्टॅट्यूटरी रिझर्वज्मधून काढलेले पैसे
- आयकराच्या रकमेतील जुळवणी
- परवानगी न दिलेला भांडवली खर्च
- मर्कंटाईल पध्दतीपासून दूर जाणे

प्रकरण ५ मधे हे मुद्दे तपशीलवार मांडून त्यावर चर्चा करण्यात आली आहे.

### १.४.१ वसुली करण्यायोग्य रकमेसंबंधी सारांश

टेरिफच्या माध्यमातून वसुली करण्यास योग्य ठरणाऱ्या रकमेसंबीचा सारांश पुढीलप्रमाणे आहे. आ.व.२००४-०५ व आ.व.२००५-०६ करिता सन्माननीय आयोगाने या रकमांची वसुली करण्यास परवानगी नाकारली होती आणि त्या रकमांमुळे परिणामी होणारा फायद्या–तोट्यातील फरक आ.व.२००६-०७ साठीचे टेरिफ निश्चित करताना विचारात घ्यावयाचे ठरविले होते. या रकमा आ.व.२००९-१० मध्ये वसूल करावयाच्या असल्यास ३-४ वर्षांसाठी त्यावर व्याजही लागू होते. या रकमा प्रामुख्याने महसुली उत्पन्नाचा भाग असल्याने सन्माननीय आयोगाने वर्किंग कॅपिटलसंबंधात परवानगी दिलेल्या दराने या रकमांवरील व्याजाचा हिशोब केला आहे. त्यानुसार ही व्याजाची एकूण रक्कम रु.१३७ कोटी इतकी येते आणि तिचे विवरण खालील तक्त्यात दिले आहेः

**तक्ता १-१३ः टेरिफद्वारे वसूल करण्यायोग्य रक्कम**

रु. कोटीमधे

| अनुक्र. | तपशील | आ.व.२००४-०५ | आ.व.२००५-०६ | एकूण |
|---|---|---|---|---|
| | सदर | | | |
| १ | अवमूल्यन | ४१ | ४ | ४५ |
| २ | आयकर | ३३ | ५० | ८३ |
| ३ | कर्मचारीसंबंधित खर्च | - | १२ | १२ |
| ४ | दुरुस्ती व देखभाल खर्च | २ | १ | ३ |
| ५ | व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्च | १९ | १६ | ३५ |
| ६ | परवानगी नाकारलेल्या भांडवली खर्चावरील व्याज | ५ | ५ | १० |
| ७ | मर्कंटाईल पध्दतीपासून दूर जाणे | (१०१) | ३५६ | २५५ |
| ८ | एकूण | (१) | ४४४ | ४४३ |
| ९ | ४ वर्षांचे व्याज | (०) | | (०) |
| १० | ३ वर्षांचे व्याज | | १३७ | १३७ |
| ११ | वसुलीसाठी व्याजासह एकूण रक्कम | (२) | ५८१ | ५७९ |

### १.४.२ ग्राहक / परवानाधारकांकडून रकमेची वसुली

ही वसुलीची रक्कम टाटा पॉवर एकात्मित आस्थापनेच्या स्वरुपात व्यवसाय करत असण्याच्या काळाशी संबंधित असल्याने तिची वसूली बीईएसटी, आरइन्फ्रा आणि टाटा पॉवर–डी या तीनही परवानाधारकांकडून करणे योग्य ठरते. म्हणून आ.व.२००४-०५ आणि आ.व.२००५-०६ या दोन्ही वर्षांमधे या परवानाधारकांना झालेल्या एकूण वीज विक्रीच्या प्रमाणात ही वसूली करण्याचा प्रस्ताव आहे. प्रत्येक वितरण परवानाधारकाकडून वसुली करावयाची रक्कम पुढीलप्रमाणेः

**तक्ता १-१४: वितरण परवानाधारकांकडून वसुली करावयाची रक्कम**

रु. कोटीमधे

| परवाना-धारक | आ.व. २००४-०५ मधील विक्री (मि.यु.) | आ.व. २००४-०५ करिता विक्रीचे प्रमाण | प्रत्येक परवाना-धारकाचा हिस्सा | आ.व. २००५-०६ मधील विक्री (मि.यु.) | आ.व. २००५-०६ करिता विक्रीचे प्रमाण | प्रत्येक परवाना-धारकाचा हिस्सा | प्रत्येक परवाना-धारकाचा एकूण हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बीईएसटी | ३,३५२ | ३५% | (१) | ३,९२४ | ३८% | २१९ | २१८ |
| आरईएल | ३,९६२ | ४१% | (१) | ४,१५५ | ४०% | २३२ | २३१ |
| टीपीसी–डी | २,२६९ | २४% | (०) | २,३३६ | २२% | १३० | १३० |
| **एकूण** | **९,५८३** | **१००%** | **(२)** | **१०,४१५** | **१००%** | **५८१** | **५७९** |

आ.व.२००९-१० मध्ये वरील तक्त्यात दर्शविलेली रक्कम देण्यासंबंधी सन्माननीय आयोगाने बीईएसटी आणि आरइन्फ्रा यांना निर्देशित करावे अशी टाटा पॉवर विनंती करत आहे. टाटा पॉवर–डी कडून वसुली करावयाची रु.१३० कोटीची रक्कम टाटा पॉवर–डीच्या आ.व.२००९-१० साठीच्या एआरआरमधे समाविष्ट करण्यात आली आहे.

## १.५ आ.व.२००८-०९ मधील कामगिरी

अर्जाच्या या भागात आ.व.२००८-०९ मील कामगिरीची माहिती देण्यात आली असून त्यासाठी आ.व.२००७-०८ साठीचा टाटा पॉवर–जीचा बहुवर्षीय वीज दर अर्ज, आ.व.२००७-०८ साठीचा सन्माननीय आयोगाने दिलेला बहुवर्षीय वीज दर आदेश, आ.व.२००८-०९ साठीच्या टेरिफ आदेशामध्ये सन्माननीय आयोगाने विचारात घेतलेला तात्पुरता सत्य-पडताळा, आ.व.२००८-०९ च्या पहिल्या सहामाहीतील (एप्रिल २००८ – सप्टेंबर २००८) प्रत्यक्ष कामगिरी आणि आ.व.२००८-०९च्या दुसऱ्या सहामाहीतील (ऑक्टोबर २००८ – मार्च २००९) अंदाजित कामगिरी विचारात घेतलेली आहे.

### १.५.१ आ.व.२००८-०९ ची कामकाजविषयक कामगिरी

आ.व.२००८-०९ मधील टाटा पॉवर–जीची वीज निर्मिती खालीलप्रमाणे :

**तक्ता १-१५: आ.व.२००८-०९ – एकूण वीज निर्मिती**

(मि.यु.)

| निर्मिती केंद्र | आयोगाची मान्यता | पहिल्या सहामाहीतील प्रत्यक्ष | दुसऱ्या सहामाहीतील सुधारित अंदाज | आ.व.२००८-०९चे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|
| **जल विद्युत्** | | | | |
| खोपोली | | १६३ | ११७ | |
| भिवपुरी | | १०१ | १९३ | |
| भिरा | | २४६ | ३२८ | |
| एकूण जल विद्युत् | १,३७५ | ५१० | ६३८ | १,१४८ |
| **औष्णिक** | | | | |
| युनिट क्र.४ | ५७३ | ४३७ | ३५६ | ७९३ |
| युनिट क्र.५ | ४,३१७ | २,१५४ | १,९९५ | ४,१४९ |
| युनिट क्र.६ | ३,५५६ | २,००९ | १,३८३ | ३,३९२ |
| युनिट क्र.७ | १,३०३ | ४५३ | ६६२ | १,११५ |
| एकूण औष्णिक | ९,७५० | ५,०५२ | ४,३९६ | ९,४४८ |

सन्माननीय आयोगाच्या मान्यतेच्या तुलनेत आ.व.२००८-०९ मधील जल विद्युत् निर्मिती (२२७ मि.यु. इतकी) कमी होण्याची शक्यता आहे. या कमी वीज निर्मितीच्या कारणांपैकी केडब्ल्यूटीए च्या नियमनांचे पालन करणे हा प्रमुख घटक आहे.
एकूण औष्णिक वीज निर्मितीचे प्रमाणदेखील मान्यताप्राप्त निर्मितीपेक्षा ३.१% ने कमी होण्याची शक्यता असून युनिट क्र.७ चे लांबलेले आऊटेज हे त्यातील प्रमुख कारण आहे.

**१.५.१.२ हीट रेट्स**

युनिट क्र.४, युनिट क्र.६ आणि युनिट क्र.७ चे हीट रेट्स सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपेक्षा खाली राहण्याची शक्यता आहे. परंतु युनिट क्र.५ चा हीट रेट वाढलेली वीज निर्मिती व त्यामुळे वाढलेला कोळशाचा इंधन स्वरुपातील वापर यामुळे सन्माननीय आयोगाने दिलेल्या मान्यतेपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.
टाटा पॉवर–जीने आपल्या एपीआर अर्जात संदर्भित विविध बाबी विचारात घेऊन युनिट क्र.५ करिता २५१२ केकॅल/केडब्ल्यूएच असावा अशी विनंती केली होती. परंतु सन्माननीय आयोगाने आ.व.२००८-०९ साठी २४९४ केकॅल/केडब्ल्यूएच इतक्या हीट रेटला मान्यता दिली. आ.व.२००८-०९ मधील अंदाजित हीट रेट २५३९ केकॅल/केडब्ल्यूएच असेल आणि तो टाटा पॉवर–जीने आपल्या अर्जात मागणी केलेल्या हीट रेटच्या अनुषंगानेच हिशोब केलेला आहे.

प्रामुख्याने कोळशाच्या वापरावर आधारित वीज निर्मितीमधे वाढ झाल्यामुळे ट्रॉम्बे वीज निर्मिती केंद्राचा एकूण हीट रेट सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या २३९४ केकॅल/केडब्ल्यूएच पेक्षा २४०३ केकॅल/केडब्ल्यूएच असा माफक प्रमाणात जास्त असेल. म्हणून सन्माननीय आयोगाने चालू वर्षासाठी प्रक्षेपित हीट रेटला (२५३९ केकॅल/केडब्ल्यूएच) परवानगी द्यावी तसेच आगामी वर्षांसाठी युनिट क्र.५ करिता विनंती करण्यात आलेल्या हीट रेटला मान्यता द्यावी अशी नम्र विनंती आहे.

**१.५.१.३ ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन**

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या मर्यादांमधेच टाटा पॉवर–जीचे प्रत्येक युनिट कार्यरत राहील अशी अपेक्षा आहे.

**१.५.२ आर्थिक कामगिरी – खर्च – आ.व.२००८-०९**

खालील भागांमधे टाटा पॉवर–जीच्या आ.व.२००८-०९ मधील कामगिरीचा अंदाज दर्शविण्यात आला आहेः

**१.५.२.१ इंधन खर्च**

सन्माननीय आयोगाने आ.व.२००८-०९ साठी मान्यता दिलेल्या रु.३,३०१ कोटीच्या तुलनेत एकूण इंधन खर्च अंदाजे रु.४,१५२ कोटी इतका असेल. कोळसा, वायू आणि इंधन तेलाच्या आ.व.२००८-०९ दरम्यान वाढलेल्या किमती हे इंधन खर्च वाढण्यामागचे प्रमुख कारण आहे.

**१.५.२.२ कामकाज व देखभाल खर्च**

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.३२९ कोटीच्या तुलनेत आ.व.२००८-०९ चा कामकाज व देखभाल खर्च (ब्रँड इक्विटीचा रु.८ कोटीचा खर्च वगळता) रु.३२५ कोटी इतका असण्याची अपेक्षा आहे.

**१.५.२.३ अवमूल्यन**

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.६१ कोटीच्या तुलनेत आ.व.२००८-०९ चे अवमूल्यन रु.५१ कोटी इतके असण्याची अपेक्षा आहे.

**१.५.२.४ व्याज आणि फायनान्स चार्जेस**

पुढील तीन सदरांच्या आधारे व्याजासंबंधीच्या खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे, (१) कर्जावरील व्याज (२) वर्किंग कॅपिटलवरील व्याज आणि (३) फायनान्स चार्जेसवरील व्याज

**कर्जावरील व्याज**

गत वर्षांच्या नॉर्मेटिव्ह लोन्सवरील (आ.व.२००३-०४ करिता भांडवली खर्चाच्या ७० % आणि आ.व.२००४-०५, आ.व.२००५-०६ व आ.व.२००६-०७ करिता भांडवलीकरणाच्या ७० %) व्याजाव्यतिरिक्त टाटा पॉवरने आडीएफसीकडून (रु.४५० कोटी) आणि आयडीबीआयकडून (रु.४०० कोटी) कर्ज घेतले आहे. आ.व.२००८-०९ करिता व्याज आणि फायनान्स चार्जेसचा हिशोब आ.व.२००८-०९ दरम्यान भांडवलीकरण करण्यात येत असलेल्या भांडवली खर्चाच्या आधारे केला आहे.

- **आयडीएफसी कर्ज**

टाटा पॉवरने भांडवली खर्चासाठी आयडीएफसीकडून खालील अटींवर रु.४५० कोटींचे कर्ज घेतले आहेः

---

मुदत : ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे

परतफेड : रु.५.६५ कोटीचे ३५ तिमाही हप्ते आणि ३६ वा हप्ता रु.२५२.२५ कोटींचा, या स्वरुपात परतफेड

व्याज दर : व्याजदर पुनर्निश्चितीच्या तारखेपूर्वी ६ महिने कंपनीचे मूल्यांकन ‘एएए ’ असल्यास बेंचमार्क दर (५ वर्ष जी–सेक दर) + १.४५% प्रतिवर्ष (दरमहा देय)
(किमान ८.९०% च्या मर्यादेत)
‘एएए ’ असे मूल्यांकन राखणे कंपनीस शक्य न झाल्यास, मुदतीचा पुनर्विचार करण्याचा हक्क आयडीएफसीकडे राहील.

---

- **आयडीबीआय कर्ज**

टाटा पॉवरने वाढत्या भांडवली खर्चासाठी आयडीबीआयकडून खालील अटींवर रु.४०० कोटींचे कर्ज घेतले आहेः

---

मुदत : ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे

परतफेड : परतफेड विलंबन अधिकाराच्या ३ वर्षांच्या मुदतीनंतर दर वर्षी ५% प्रमाणे ९ वर्षे आणि उर्वरित रक्कम १०व्या वर्षात

व्याज दर : बेंचमार्क व्याजदर (एसबीआय पीएलआर) – दर साल २.७६% (कर्जाची पूर्ण रक्कम अदा करण्यापूर्वी कर्जापोटीच्या खर्चाचा पुनर्विचार करण्याचा आयडीबीआयला अधिकार आहे.

---

या कर्जापोटी आ.व.२००८-०९ दरम्यान देण्यात येत असलेल्या विविध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-१६: आ.व.२००८-०९ – आयडीबीआय कर्ज आणि व्याजाचे दर**

| रक्कम देण्यात येण्याचा महिना | देण्यात येत असलेली रक्कम (रु. कोटीमधे) | नक्त व्याजदर (%) |
|---|---|---|
| मार्च २००८ अखेर | २००.०० | १०.५० |
| ऑगस्ट २००८ | ९२.०० | ११.५० |
| ऑक्टोबर २००८ | ८४.०० | १४.०० |
| एकूण | ३७६.०० | ११.५३ |

यानुसार आ.व.२००८-०९ करिता भांडवलीकरणाचा सरासरी दर ११.५३% इतका विचारात घेण्यात आला आहे.

वरील मुद्दे विचारात घेऊन आ.व.२००८-०९ करिता व्याजापोटीचा खर्च सन्माननीय अयोगाने मान्यता दिलेल्या रु.३४ कोटींच्या तुलनेत रु.३५ कोटी इतका अंदाजिण्यात आला आहे. आर्थिक बाजारातील सध्याच्या परिस्थितीनुसार आयडीएफसी आणि आयडीबीआयकडून घेतलेल्या कर्जांवरील सुधारित व्याजदरांमुळे हा फरक येत आहे.

वरील व्याजापोटीच्या खर्चाच्या हिशोबात आयडीबीआयच्या कर्जाची रक्कम टाटा पॉवर–जी, टाटा पॉवर–टी आणि टाटा पॉवर–डी या तीनही व्यवसायात उपयोगात आणली जाणार असल्याचे गृहीत धरले आहे. तीनही व्यवसायातील भांडवलीकरणाच्या आधारे आयडीबीआयच्या कर्जाची रु.४०० कोटीची रक्कम पुरेशी नाही. म्हणून टाटा पॉवर–जीला आ.व.२००८-०९ मधे आपल्या भांडवली खर्चासाठी आणखी (कर्जाच्या इतर स्त्रोतांकडून घ्याव्या लागणाऱ्या कर्जासह) कर्ज घ्यावे लागण्याची शक्यता आहे. या वाढीव कर्जाची रक्कम आणि अटी निश्चित होईपर्यंत या वर्षाच्या व्याजापोटीच्या खर्चाचा अंदाजित हिशोब करण्यासाठी ही वाढीव कर्जे वर उल्लेखिलेल्या अटींवरच उपलब्ध होतील असे गृहीत धरले आहे. प्रत्यक्ष घेतलेल्या कर्जांचा व्याजापोटीच्या खर्चाच्या रकमेवर होणारा परिणाम आ.व.२००८-०९ च्या सत्य-पडताळ्यादरम्यान समाविष्ट केला जाईल.

**वर्किंग कॅपिटलवरील व्याज**

१२.७५% व्याज दर आणि आ.व.२००८-०९ करिता सन्माननीय आयोगाने टेरिफ नियमनामध्ये निर्दिष्ट केलेल्या घटकांच्या अनुषंगाने वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा खर्च रु.१२९ कोटी इतका येतो.

भाग ४.६.३ मधे दर्शविल्यानुसार वर्किंग कॅपिटलच्या प्रत्यक्ष आवश्यकतेवरील नॉर्मेटिव्ह व्याजदरावर आधारित (एसबीआय पीएलआर) व्याजाचा विचार फायदा आणि तोट्याचा हिशोब करण्यासाठी करण्यात यावा अशी टाटा पॉवर–जी विनंती करत आहे. प्रत्यक्ष वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीची टाटा पॉवर–जीने हिशोब केलेली रक्कम रु.१३३ कोटी येते.

आ.व.२००८-०९च्या पहिल्या सहामाहीसाठी लघु मुदतीने घेतलेल्या कर्जावरील व्याजापोटी टाटा पॉवरने रु.७ कोटी दिले असल्याचा हिशोब निघतो. त्यानुसार अशा लघु मुदतीच्या कर्जावरील व्याजाची या वर्षासाठीची अंदाजित रक्कम रु.१५ कोटी इतकी अंदाजिली आहे. टाटा पॉवरच्या कामकाजातील एकूण वर्किंग कॅपिटलमधील टाटा पॉवर–टीच्या नॉर्मेटिव्ह वर्किंग कॅपिटलच्या हिश्शाच्या आधाराने काढलेल्या प्रमाणात या रकमेपैकी टाटा पॉवर–जीचा हिस्सा रु.१३ कोटी इतका येतो. याशिवाय टाटा पॉवरने लाईन ऑफ बायर्स क्रेडिटच्या माध्यमातूनही आपल्या वर्किंग कॅपिटलच्या गरजा भागवण्यासाठी आर्थिक पाठबळ उभे केले आहे. अशा बायर्स क्रेडिटच्या माध्यमातून आ.व.२००८-०९च्या पहिल्या सहामाहीसाठी उभ्या केलेल्या आर्थिक पाठबळाचा खर्च रु.३३.२ कोटी इतका निघतो. अशा स्वरुपाच्या आर्थिक पाठबळाच्या रकमेचे व्यवहार विदेशी चलनाच्या खरेदी/विक्रीच्या दरावर बदलते असल्यामुळे आणि सध्या या दरात मोठ्या प्रमाणात चढ-उतार होत असल्याने वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीसाठी कोणताही प्रक्षेपित अंदाज केलेला नाही. यानुसार, आ.व.२००८-०९ करिता वर्किंग कॅपिटलवरील व्याजाच्या रकमेचा प्रक्षेपित अंदाज रु.४६ कोटी इतका येतो.

**फायनान्स चार्जेस**

सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.०.०० कोटीच्या तुलनेत आ.व.२००८-०९ च्या फायनान्शियल चार्जेसची रक्कम रु.(०.१९) कोटी इतके असण्याची अपेक्षा आहे.

**१.५.२.५ टाटा पॉवरच्या लोड कंट्रोल सेंटर (एलसीसी) चार्जेसचा हिस्सा**

आ.व.२००८-०९ करिता टाटा पॉवर–जीसाठी एलसीसी चार्जेसचा हिस्सा रु.२ कोटी येतो. टाटा पॉवर-टीच्या आ.व.२००८-०९ साठीच्या एपीआर अर्जामधे एलसीसी चार्जेसचा हिशोब सादर करण्यात आलेला आहे.

**१.५.२.६ इक्विटीवरील परतावा**

भांडवलीकृत खर्च आणि डेटःइक्विटीची ७०:३० अशी प्रमाणपध्दत याच्या आधारे आलेली इक्विटी आणि त्यावरील परताव्याची आ.व. २००७-०८ साठीची रक्कम परताव्याच्या मान्यताप्राप्त रु.१५७ कोटींच्या तुलनेत रु.१५४ कोटी इतकी आहे.

**१.५.२.७ आयकर**

आ.व.२००८-०९ करिता करासाठीची तरतूद रु.८८ कोटीच्या इक्विटीवरील परताव्याच्या रकमेवर लागू होणाऱ्या कराच्या दराच्या आधाराने निश्चित केली आहे. मालमत्तेच्या डब्ल्यूडीव्ही किमतीचा आधार आणि आयकर कायदा १९६१च्या कलम १४अ, ३२अ, ४३अ आणि ४३ब मधील तरतुदींच्या आधारे कराच्या रकमेचा हिशोब करण्यात आला आहे. कराच्या रकमेचा हिशोब करण्यामधे टाटा पॉवर–जीने सन्माननीय आयोगाच्या सन २००७च्या दावा क्र.६४,६५ आणि ६६ संदर्भातील निकालांचाही विचार अंतर्भूत केला आहे.

**१.५.२.८ भांडवली खर्च**

सन्माननीय आयोगाने आ.व.२००८-०९ साठी मान्यता दिलेल्या रु.२७६ कोटीच्या तुलनेत भांडवली खर्चाची अंदाजित रक्कम आता रु.३५६ कोटी इतकी अंदाजिली आहे.

**१.५.२.९ नॉन-टेरिफ इन्कम**

सन्माननीय आयोगाने आ.व.२००८-०९ साठी मान्यता दिलेल्या रु.९ कोटीच्या तुलनेत नॉन-टेरिफ इन्कमची रक्कम रु.१३ कोटी इतकी अंदाजिली आहे.

**१.५.२.१० इन्सेन्टिव्ह**

टेरिफ नियमनांच्या अनुषंगाने, औष्णिक आणि जल विद्युत् निर्मितीवरील अंदाजित इन्सेन्टिव्हची रक्कम रु.३२ कोटी इतकी अंदाजिली आहे.

**१.५.३ आ.व.२००८-०९ करिता ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस**

वर उल्लेख केलेल्या विविध खर्चाच्या मुद्यांच्या आधारे, आ.व.२००८-०९ करिता अंदाजित ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस खालीलप्रमाणे :

**तक्ता १-१७: आ.व.२००८-०९ – सुधारित ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस**

रु. कोटीमधे

| तपशील | आयोगाची मान्यता | आ.व.२००८-०९ करिता सुधारित अंदाज |
|---|---|---|
| कामकाज व देखभाल खर्च | ३२९ | ३२५ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | ३४ | ३५ |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ९९ | १२९ |
| फायनान्स चार्जेस वरील व्याज | - | (०) |
| अवमूल्यन | ६१ | ५१ |
| इक्विटीवरील परतावा | १५७ | १५४ |
| आयकर | ४५ | ८८ |
| एलसीसी चार्जेसचे विभाजन | - | २.०३ |
| वजा : नॉन – टेरिफ इन्कम | ९ | १३ |
| **ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस** | **७१६** | **७७१** |

नॉर्मेटिव्ह पातळीच्या तुलनेत टाटा पॉवर–जी बऱ्याच जास्त प्रमाणात उपलब्धता आणि क्षमतेचा निर्देशांक साध्य करणार आहे व त्यामुळे ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस पूर्णतः वसूल करण्यास पात्र आहे. याशिवाय, वर उल्लेख केल्यानुसार टाटा पॉवर–जी इन्सेन्टिव्ह मिळण्यासही पात्र ठरणार आहे.

### १.५.४ आ.व.२००८-०९ करिता फायदा आणि तोट्याचे विभाजन

भाग ४.१४ मध्ये स्पष्ट केल्यानुसार आ.व.२००७-०८ करिता फायदा आणि तोट्याचे विभाजन पुढीलप्रमाणे येतेः

#### १.५.४.१ इंधन खर्च

टाटा पॉवर–जीतर्फे वाढीस मान्यता देण्याची विनंती करण्यात येत असलेल्या युनिट क्र.५ आणि युनिट क्र.७ व्यतिरिक्त, मान्यताप्राप्त हीट रेट्स आणि ऑक्झिलिअरी कन्झम्प्शनच्या आधारे हिशोब करण्यात आलेला इंधन खर्च पुढीलप्रमाणे आहे :

**तक्ता १-१८: आ.व.२००८-०९ – मान्यताप्राप्त नॉर्म्सवर आधारित इंधन खर्च**

रु. कोटीमधे

| तपशील | | युनिट क्र.४ | युनिट क्र.५ | युनिट क्र.६ | युनिट क्र.७ | इंसआ आणि इतर जुळवणी | एकूण इंधन खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंधन खर्च (रुपये कोटीमध्ये) | अ | ६३३ | १,१०१ | २,३४१ | ७७ | | ४,१५२ |
| प्रत्यक्ष हीट रेट | ब | २,५२२ | २,५३९ | २,३५३ | १,९६८ | | |
| प्रत्यक्ष ऑक्झी. कन्झ.(%) | क | ७.५% | ४.८% | ३.३% | २.४% | | |
| प्रत्यक्ष नक्त हीट रेट | ड = ब/(१-क) | २,७२६ | २,६६७ | २,४३३ | २,०१७ | | |
| नॉर्मेटिव्ह हीट रेट | ई | २,५७० | २,५३९ | २,४०० | १,९७१ | | |
| नॉर्मेटिव्ह ऑक्झी.कन्झ. (%) | फ | ८.०% | ५.५% | ३.५% | २.८% | | |
| नॉर्मेटिव्ह नक्त हीट रेट | ग = ई/(१-फ) | २,७९३ | २६८६ | २,४८७ | २०२७ | | |
| **नॉर्मेटिव्ह नक्त हीट रेटनुसार इंधन खर्च (रु. कोटीमध्ये)** | **ह = ग/ड*अ** | **६४९** | **१,१०९** | **२,३९३** | **७७** | | **४,२२८** |
| नक्त फायदा/(तोटा) | ऐ = ह – अ | १६ | ८ | ५२ | ० | | ७६ |
| वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित | ज = १/३*ऐ | ५ | ३ | १७ | ० | | २५ |

टाटा पॉवर–जीने रु.२५ कोटीचा फायदा वितरण परवानाधारकांकडे हस्तांतरित केला असल्याचे वरील तपशीलावरुन निदर्शनास येईल.

### १.५.४.२ कामकाज व देखभाल खर्च

कामकाज व देखभाल खर्चाच्या रकमेतील बदलामुळे परिणामी फायदा आणि तोटा पुढीलप्रमाणे :

**तक्ता १-१९: आ.व.२००८-०९ – कामकाज व देखभाल खर्चाच्या रकमेतील बदलामुळे परिणामी फायदा आणि तोटा**

| अनुक्र. | तपशील | रुपये कोटीमधे |
|---|---|---|
| १ | आ.व.२००८-०९ करिता मान्यताप्राप्त कामकाज व देखभाल खर्च | ३२९ |
| २ | ब्रँड इक्विटीसह प्रत्यक्ष कामकाज व देखभाल खर्च | ३२५ |
| ३ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | - |
| ४ | नियंत्रण करणे शक्य नसलेल्या खर्चाव्यतिरिक्तचा प्रत्यक्ष खर्च (२–३) | ३२५ |
| ५ | वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | १ |
| ६ | टाटा पॉवर–जीने राखून ठेवावयास परवानगी असलेली रक्कम | ३ |
| **७** | **नक्त अधिकृती (३) + (४) + (६)** | **३२७** |

### १.५.४.३ वर्किंग कॅपिटलवरील व्याज

या सदरातील रकमांमधील बदलामुळे परिणामी फायदा आणि तोटा पुढीलप्रमाणे येतो :

**तक्ता १-२०: आ.व.२००८-०९ – वर्किंग कॅपिटलसंदर्भातील खर्चातील बदलामुळे परिणामी फायदा आणि तोटा**

| अनुक्र. | तपशील | रुपये कोटीमधे |
|---|---|---|
| १ | मान्यताप्राप्त नॉर्म्सनुसार वर्किंग कॅपिटलवरील व्याज | १२९ |
| २ | वर्किंग कॅपिटलवरील प्रत्यक्ष व्याज | १३३ |
| ३ | नियंत्रण करणे शक्य नसलेला खर्च | - |
| ४ | नियंत्रण करणे शक्य नसलेल्या खर्चाव्यतिरिक्तचा प्रत्यक्ष खर्च (२–३) | १३३ |
| ५ | वितरण परवानाधारकांना हस्तांतरित केलेली रक्कम (फायदा/तोट्याचा १/३ हिस्सा) (१/३ * (१)-(४)) | (१) |
| ६ | **नक्त अधिकृती (१) + (२) + (५)** | १३० |

### १.५.५ वीज पुरवठा व्यवसायातून महसूल

सन्माननीय आयोगाने युनिट क्र.४ ते ७ आणि जल विद्युत् संचांपासूनच्या फिक्स्ड चार्जेसला मान्यता दिली होती. युनिट क्र.८ साठीच्या फिक्स्ड चार्जेस आणि एनर्जी चार्जेसला तात्पुरत्या स्वरुपाची वेगळी मान्यता दिली होती. टाटा पॉवर–जीच्या युनिट क्र.८ व्यतिरिक्त इतर संचांसाठीचा वितरण परवानाधारकांकडून वसुली केलेला महसूल खाली दिला आहे :

**तक्ता १-२१: आ.व.२००८-०९ – वीज निर्मिती व्यवसायातून महसूल**

| अनु. | तपशील | एकक | बीईएसटी | | आरईएल | | टाटा पॉवर–डी | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सहामाही १ | सहामाही २ | सहामाही १ | सहामाही २ | सहामाही १ | सहामाही २ | |
| १ | फिक्स्ड चार्जेस | रु.कोटीमधे | १२२ | १२२ | ७६ | ७६ | ७२ | ७२ | ५४० |
| २ | इन्सेन्टिव्ह | रु.कोटीमधे | ७ | ५ | ५ | ३ | ४ | ३ | २७ |
| २ | जलविद्युत् रिबेट | रु.कोटीमधे | (२२) | (२२) | (१३) | (१३) | (१३) | (१३) | (९८.४१) |
| | | | | | | | | | |
| ३ | एनर्जी रेट | रु./केडब्ल्युएच | ४.७१ | ३.९२ | ४.७१ | ३.९२ | ४.७१ | ३.९२ | ४.३३ |
| ४ | एनर्जी सोल्ड | मि.यु. | २,४०९ | २,१८० | १,५०६ | १,३६३ | १,४३६ | १,३०० | १०,१९४ |
| ५ | एनर्जी चार्ज | रु.कोटीमधे | १,१३४ | ८५४ | ७०९ | ५३४ | ६७६ | ५०९ | ४,४१७ |
| | | | | | | | | | |
| ६ | **एकूण = १+३+४+५** | **रु.कोटीमधे** | **१,२४१** | **९५८** | **७७६** | **६००** | **७४०** | **५७१** | **४,८८५** |

## १.५.६ आ.व.२००८-०९ करिता नक्त वार्षिक महसूल आवश्यकता आणि फरक

फायदा आणि तोट्याच्या विभाजनासह आ.व.२००८-०९ करिता केलेल्या जुळवण्यांसह खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता १-२२: आ.व.२००८-०९ करिता नक्त वार्षिक महसूल आवश्यकता**

रु. कोटीमधे

| | | आ.व २००८-०९ | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्र. | तपशील | मान्यताप्राप्त | नियमनानुसार पात्रता | नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांद्वारे आलेले इफिशियन्सी गेन्स/लॉस | नियंत्रण करणे शक्य असलेल्या घटकांद्वारे आलेल्या इफिशियन्सी गेन्स/लॉसच्या जुळवणीनंतरची (रिझर्वज्‌मधे केलेल्या जमेसह) नक्त पात्रता |
| एक | महसूल | | | | ४,८९९ |
| | - वीज पुरवठा | | | | ४,८८५ |
| | - नॉन – टेरिफ इन्कम | ९ | | | १३ |
| | | | | | |
| दोन | खर्च | | | | |
| १ | इंधन संबंधित खर्च | ३,३०१ | ४,२२८ | २५ | ४,२०३ |
| २ | कामकाज व देखभाल खर्च | ३२९ | ३२९ | १ | ३२७ |
| ३ | अवमूल्यनासंदर्भातील अग्रिम हप्त्यासह अवमूल्यन, | ६१ | ५१ | | ५१ |
| ४ | दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावरील व्याज | ३४ | ३५ | | ३५ |
| ५ | वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ९९ | १२९ | (१) | १३० |
| ६ | इतर फायनान्स चार्जेस + एलसीसी चार्जेस | - | २ | | २ |
| ९ | आयकर | ४५ | ८८ | | ८८ |
| १० | इक्विटीवरील परतावा | १५७ | १५४ | | १५४ |
| **११** | **एकूण खर्च** | **४,०२६** | **५,०१६** | **२६** | **४,९९१** |
| १२ | इन्सेन्टिव्ह | | ३२ | | ३२ |
| **१३** | **इन्सेन्टिव्हसह एकूण** | | **५,०४८** | | **५,०२२** |
| | | | | | |
| तीन | नक्त फरक / (फायदा) | | | | १२४ |

## १.६ आ.व.२००८-०९ सह आ.व.२००७-०८ चा फरक/फायदा

आ.व.२००९-१०च्या कामगिरीबाबत विचार करण्यापूर्वी गत वर्षांच्या फरक आणि फायद्याचा कॅरीइंग कॉस्टसहित विचार करणे योग्य आहे असा टाटा पॉवर–जीचा विचार आहे. खाली दिलेल्या तक्त्यात आ.व.२००७-०८ आणि आ.व.२००८-०९ चा कॅरीइंग कॉस्टसहितचा फरक आणि फायद्याचा तपशील दिला आहे. तसेच प्रत्येक परवानाधारकाचा हिस्सादेखील त्यात दाखविला आहे.

**तक्ता १-२३: आ.व.२००७-०८ – कॅरीइंग कॉस्टसहित फरक/फायद्याचे विभाजन**

रु. कोटीमधे

| अनुक्र. | तपशील | आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | टाटा पॉवर–जी फरक / फायदा | (५७) | १२४ | ६७ |
| २ | महिनावार व्याज | १८ | ६ | |
| ३ | व्याजाचा दर * | १२.८३% | १३.००% | |
| ४ | व्याजापोटीचा खर्च | (११) | ८ | (३) |
| ५ | **व्याजापोटीच्या खर्चासह फरक / (फायद्याचे) विभाजन** | **(६८)** | **१३२** | **६४** |
| | | | | |
| | **फरक / (फायद्याचे) विभाजन** | | | |
| | **बीईएसटी** | (२५) | ५९ | ३४ |
| | **आरइन्फ्रा** | (२९) | ३७ | ८ |
| | **टाटा पॉवर–डी** | (१४) | ३५ | २२ |
| | **एकूण** | **(६८)** | **१३२** | **६४** |

## १.७ आ.व.२००९-१० करिता वार्षिक महसूल आवश्यकता

दिनांक ६ नोव्हेंबर २००७ च्या आपल्या आदेशाद्वारे सन्माननीय आयोगाने टाटा पॉवर – जी आणि बीईएसटी आणि टाटा पॉवर – जी आणि टाटा पॉवर – डी दरम्यानचा वीज खरेदी करार किंवा पॉवर परचेस ॲग्रीमेंट (पीपीए) ला मान्यता दिली आहे. या करारांनुसार टाटा पॉवर–जी ची निर्मिती क्षमता बीईएसटी आणि टाटा पॉवर–डी खरेदी करतील असे अपेक्षित आहे. टाटा पॉवर–डी आणि बीईएसटीसाठीचे या क्षमताविभाजनास सन्माननीय आयोगाने टेरिफसंबंधी आदेशाद्वारे जून २००८ मधे मान्यता दिली आहे. या पीपीए करारांमध्ये जानेवारी २००९ मधे कार्यान्वित होत असलेल्या २५० मेगावॉट क्षमतेच्या युनिट क्र.८ च्या एकूण क्षमतेपैकी १५० मेगावॉट क्षमतेच्या विभाजनाचादेखील विचार करण्यात आलेला आहे. या पीपीए करारांद्वारे बीईएसटीला १०० मेगावॉट आणि टाटा पॉवर-डीला ५० मेगावॉट वीज विकण्यात येणार आहे. युनिट क्र.८ मधील उर्वरित १०० मेगावॉट क्षमतेससाठी टाटा पॉवर ट्रेडिंग कंपनी लिमिटेड (टीपीटीसीएल) ("टीपीटीसीएल पीपीए क्षमता") करार करण्यात आलेला आहे.

आरइन्फ्राने अद्याप टाटा पॉवर–जीबरोबर कोणत्याही प्रकारच्या पीपीए करारावर स्वाक्षरी केलेली नाही याची कृपया नोंद घ्यावी. (कोणत्याही प्रकारची बांधिलकी गृहीत न धरता) सध्याच्या एकूण निर्मिती क्षमतेपैकी (१७७७ मेगावॉट) उर्वरित क्षमतेची, म्हणजेच बीईएसटी आणि टाटा पॉवर–डीला वाटप करुन उरलेल्या ५०० मेगावॉट विजेची विक्री सन्माननीय आयोगाने आरइन्फ्रासाठी निश्चित केलेल्या दरानुसार तात्पुरत्या काळासाठी काटेकोरपणे प्रत्येक दिवशी आणि दिवस-दर-दिवस पध्दतीने आणि जोपर्यंत टाटा पॉवर – जी या उर्वरित ५०० मेगावॉट क्षमतेसाठी योग्य असा दुसरा खरेदीदार मिळवून त्याचेबरोबर पीपीए करार करत नाही तोपर्यंत केली जाईल या गृहीतकावर आधारुन आ.व. २००९-१० करिता टाटा पॉवर–जीच्या एकत्रित आणि निव्वळ वीज निर्मितीचा प्रक्षेपित अंदाज आणि त्यानुसार येणाऱ्या महसुलाची निश्चिती करण्यात आली आहे. उल्लेख केलेल्या उर्वरित ५०० मेगावॉट क्षमतेपैकी आरइन्फ्राला केल्या जाणाऱ्या विक्रीमुळे या ५०० मेगावॉट क्षमतेसंदर्भात किंवा त्याच्या अंशरुप क्षमतेसंदर्भात दीर्घ मुदतीचा पीपीए करार करण्याच्या आणि त्याद्वारे कोणत्याही परवानाधारकाला किंवा ग्राहकाला ती

वीज विकण्याच्या इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या कलम १०(२) च्या तरतुदींनुसार असलेल्या टाटा पॉवर–जीच्या हक्कास कधीही आणि कोणत्याही प्रकारची बाधा होणार नाही. युनिट क्र.८ च्या क्षमतेसंदर्भात यापूर्वीच उल्लेख केलेल्या मान्यताप्राप्त करारांनुसार १५० मेगावॉट विजेचे वाटप बीईएसटी आणि टाटा पॉवर–डीमधे होणार आहे. तसेच आधी उल्लेख केल्यानुसार युनिट क्र.८ च्या उर्वरित १०० मेगावॉट क्षमतेसाठी वाटाघाटींनंतर ठरलेल्या दरानुसार विक्रीचा टीपीटीसीएलबरोबर करार करण्यात आला आहे.

टाटा पॉवर–जीच्या वीज केंद्रातून (युनिट क्र.८ च्या क्षमतेपैकी टीपीटीसीएल पीपीए करारान्वये विक्री निश्चिती झालेल्या १०० मेगावॉट विजेव्यतिरिक्त इतर) निर्माण झालेल्या विजेचे फक्त मेरिट ऑर्डर डिस्पॅच (एमओडी) ठरवण्यासाठी सध्याच्या तीन वितरण परवानाधारकांच्या विजेच्या गरजांचा विचार करण्यात आला आहे. टाटा पॉवर–जीने आरइन्फ्राला या एमओडीमध्ये दर्शविल्याप्रमाणे वीज पुरवणे बंधनकारक असल्याचा किंवा तसा वीज पुरवठा करण्याची टाटा पॉवर–जीवर जबाबदारी असल्याचा अर्थ त्यातून काढला जाऊ नये हे आम्ही इथे स्पष्टपणे नमूद करत आहोत.

वरील मुद्यांच्या आधारे, करारकृत क्षमतांचे विवरण खालील तक्त्यात दिले आहेः

**तक्ता १-२४: आ.व.२००९-१० – टाटा पॉवर–जीची (अस्तित्वातील संचांची) करारकृत क्षमता**

| | टाटा पॉवर–जीबरोबरच्या पीपीए कराराचे स्वरुप | अस्तित्वातील संचांच्या क्षमतेपेकी प्रक्षेपित अंदाजासाठी विचारात घेतलेली क्षमता (मेगावॉटमधे) | % |
|---|---|---|---|
| बीईएसटी | स्वाक्षरीकृत आहे. | ८०० | ४५.०२ |
| टाटा पॉवर–डी | स्वाक्षरीकृत आहे. | ४७७ | २६.८४ |
| उर्वरित क्षमता | | ५०० | २८.१४ |
| एकूण | | १,७७७ | |

जानेवारी २००९मधे युनिट क्र.८ चे कार्यान्वयन करण्याचे नियोजित केले आहे. स्वाक्षरीकृत पीपीए करारांच्या आधारे, या अर्जासाठी यनिट क्र.८ च्या क्षमतेचे विभाजन खालीलप्रमाणे करण्यात येणार आहे :

**तक्ता १-२५: आ.व.२००९-१० – (युनिट क्र.८ ची) करारकृत क्षमता**

| | टाटा पॉवर–जीबरोबरच्या पीपीए कराराचे स्वरुप | अस्तित्वातील संचांच्या क्षमतेपेकी प्रक्षेपित अंदाजासाठी विचारात घेतलेली क्षमता (मेगावॉटमधे) | % |
|---|---|---|---|
| बीईएसटी | स्वाक्षरीकृत आहे. | १०० | ४०.०० |
| टाटा पॉवर–डी | स्वाक्षरीकृत आहे. | ५० | २०.०० |
| टीपीटीसीएल | | १०० | ४०.०० |
| एकूण | | २५० | |

टीप : टाटा पॉवर–जीकडून कोणत्याही स्वरुपाचा वीज पुरवठा करण्याची मागणी करण्याचा हक्क आरइन्फ्राला प्राप्त होत असल्याचा अर्थ किंवा ध्वन्यर्थदेखील या एआरआर अर्जात लिहिलेल्या कोणत्याही गोष्टीतून निघत नाही.

### १.७.१ विजेची आवश्यकता

गत काळातील वीज मागणीतील वाढीच्या आधारे या तीन वितरण परवानाधारकांना करण्यात यावयाच्या विक्रीचा अंदाज करण्यात आला आहे. या तीन वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांमधे औद्योगिक, व्यापारी आणि घरगुती ग्राहकांचा समावेश

आहे. आगामी काळातील मागणीचा अंदाज करण्यासाठी गत काळातील वाढीच्या अनुभवाचा आधार घेणे बहुतांशी अचूक असल्याचे सिध्द झाले आहे.

वरील मुद्यांच्या आधारे टाटा पॉवर–जीने मुंबईच्या गेल्या तीन वर्षातील (आ.व.२००४-०५ ते आ.व.२००७-०८) विजेच्या संपूर्ण मागणीचा सीएजीआरच्या आधारे पुनर्विचार केला आहे. पुरवठा-प्रक्रियेदरम्यानच्या एकूण नुकसानीसह मुंबईच्या विजेच्या मागणीचा आ.व.२००९-१० करिता अंदाज करण्यासाटी व त्यानुसार वीज निर्मितीची आवश्यकता निश्चित करण्यासाठी या सीएजीआरचा उपयोग केला आहे. टाटा पॉवर–जी आणि आरइन्फ्राच्या विविध संचांच्या आऊटेजेससाठी तरतूद केल्यानंतर मुंबईची विजेची गरज भागवण्यासाठी टाटा पॉवर–जीच्या प्रत्येक संचामधून पुरवली जाणारी वीज मेरिट ऑर्डर डिस्पॅच (एमओडी) मॉडेलच्या सहाय्याने निश्चित करण्यात आली आहे.

### १.७.२ टाटा पॉवर–जीची महसूल आवश्यकता

वितरण परवानाधारकांना वीज पुरवणाऱ्या वीज निर्मिती व्यवसायाने लावावयाचा दर एनर्जी चार्जेस आणि ॲन्युअल फिक्स्ड चार्जेसच्या रुपात निश्चित केला आहे.

### १.७.३ एनर्जी चार्जेस

#### १.७.३.१ विजेची उपलब्धता

टाटा पॉवर–जीची ४४७ मेगावॉट जलविद्युत् आणि १३३० मेगावॉट औष्णिक निर्मितीचा समावेश असलेली सध्याची एकूण निर्मितीक्षमता १७७७ मेगावॉट आहे. जानेवारी २००९ मधे कार्यान्वित होत असलेल्या २५० मेगावॉट क्षमतेच्या युनिट क्र.८ मुळे ट्रॉम्बे वीज केंद्राच्या क्षमतेत वाढ होईल. जलविद्युत् निर्मितीक्षमतेतून (कृष्णा वॉटर ट्रिब्यूनल ॲवॉर्ड – केडब्ल्यूटीएद्वारे लादण्यात आलेल्या मर्यादांच्या आधारे) १,४४३ मि.यु. वीज निर्मिती होईल असा अंदाज केला आहे. औष्णिक वीज निर्मिती संचांचे सरासरी वय २० वर्षांपेक्षा जास्त असले तरी नॉर्मेटिव्ह पातळ्यांपेक्षा बऱ्याच जास्त प्रमाणात औष्णिक वीज निर्मिती क्षमता उपलब्ध असण्याची शक्यता आहे.

इंधन उपलब्धतेचा विचार करुन संचांच्या उपलब्धतेचा प्रक्षेपित अंदाज करणे टेरिफ नियमनांमधे अनुस्यूत आहे. टाटा पॉवर–जी या संदर्भात असे नमूद करु इच्छिते की सध्या ट्रॉम्बेला होणारा इंधन वायूचा पुरवठा कमी करण्यात आलेला असून आ.व.२००९-१० मध्ये तो आणखी कमी होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या अनुपलब्धतेमुळे युनिट क्र.७च्या निर्मितीक्षमतेवर परिणाम होतो. तसेच इंधन वायूचा पुरवठा टाटा पॉवर–जीच्या संपूर्णपणे नियंत्रणाबाहेर आहे हे इथे नमूद करण्यात येत आहे. म्हणून हा मुद्दा विचारात घेऊन उपलब्धता ८०% पेक्षा कमी असण्याच्या परिस्थितीतही फिक्स्ड चार्जेस वसूल करण्याची टाटा पॉवर–जीला परवानगी देण्याची सन्माननीय आयोगाला आम्ही नम्र विनंती करत आहोत.

#### १.७.३.२ ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन

सन्माननीय आयोगाने बहुवर्षीय टेरिफ आदेशामध्ये मान्यता दिलेल्या नॉर्मेटिव्ह पातळीवरच जलविद्युत् आणि औष्णिक वीज निर्मिती संचांसंबंधातील ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन राहील अशी अपेक्षा आहे.

#### १.७.३.३ स्टेशन हीट रेट

युनिट क्र.४, युनिट क्र.६ आणि युनिट क्र.७ चे हीट रेट्स सन्माननीय आयोगाने आ.व.२००८-०९साठी मान्यता दिलेल्यापातळ्यांवरच राहतील असा विचार केला आहे. परंतु युनिट क्र.५ च्या बाबतीत स्वतंत्रपणे मान्यता मिळालेल्या पातळ्या विचारात घेतल्या आहेत.

युनिट क्र.५ : आधी उल्लेख केल्याप्रमाणे, (१) युनिट क्र.५ मधील जास्तीचा कोळसा वापर, (२) कोल मिल्सच्या कामकाजातील सुरक्षाविषयक सुधारणा आणि (३) बहुवर्षीय टेरिफ अर्ज सादर करताना त्या अर्जात दाखवलेला हीट रेट आणि मान्यताप्राप्त हीट रेट यामधील फरक म्हणजेच कोळशाच्या दर्जामुळे हीट रेटमधे झालेली वाढ यामुळे २५५५ केकॅल/केडब्ल्यूएच इतका वाढीव हीट रेट वीज निर्मितीचा अंदाज करण्यासाठी विचारात घेतला आहे.

वरील मुद्यांच्या आधारे, सन्माननीय आयोगाने आ.व.२००९-१०साठी मान्यता दिलेल्या २३७७ केकॅल/केडब्ल्यूएचच्या तुलनेत ट्रॉम्बे वीज केंद्राचा हीट रेट २४०२ केकॅल/केडब्ल्यूएच इतका माफक प्रमाणात जास्त असण्याची अपेक्षा आहे.

**तक्ता १-२६: आ.व.२००९-१० – टाटा पॉवर–जीच्या संचांचा एकत्रित हीट रेट**

**(केकॅल/केडब्ल्यूएच)**

| वीज निर्मिती केंद्र | आ.व.२००८-०९चे सुधारित अंदाज | आयोगाची मान्यता | आ.व.२००९-१०चे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| युनिट क्र.४ | २५२२ | २५७५ | २५७५ |
| युनिट क्र.५ | २५३९ | २४९९ | २५५५ |
| युनिट क्र.६ | २३५३ | २४०० | २४०० |
| युनिट क्र.७ | १९६८ | १९७१ | १९७१ |
| **वीज केंद्र** | **२४०३** | **२३७७** | **२४०२** |

### १.७.४ आ.व. २००९-१० करिता एनर्जी बॅलन्स

कामकाजविषयक निकष, इंधनाच्या किमती आणि मेरिट ऑर्डर डिस्पॅच यांच्या आधारे विजेच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी विविध स्रोतांमधून काढलेले परिणामी नक्त डिस्पॅचेस आणि त्यांच्या परिणामाने राहणारा नियंत्रण काळासाठीचा एनर्जी बॅलन्स पुढीलप्रमाणे आहे :

**तक्ता १-२७ : एकत्रित डिस्पॅच**

| वीज निर्मिती | इंधन | मि.यु. |
|---|---|---|
| युनिट क्र.४ | इंधन तेल | ७२ |
| युनिट क्र.५ | इंधन तेल | २८९ |
| युनिट क्र.५ | कोळसा | ३,४८० |
| युनिट क्र.६ | इंधन तेल | ३,७०४ |
| युनिट क्र.६ | वायू | ३७ |
| युनिट क्र.७ | वायू | १,३८१ |
| युनिट क्र.८ (१५० मेगावॉट) | कोळसा + सेकंडरी ऑईल | १,०९० |
| हायडेल | पाणी | १,४४३ |
| **एकूण** | | **११,४९६** |

**तक्ता १-२८: आ.व.२००९-१० – एक्स-बस एनर्जी बॅलन्स**

मि.यु.

| | |
|---|---|
| **मुंबईची एकूण एक्स-बस आवश्यकता** | **१७,९९३** |
| **पुरविली जाईल** | |
| **टाटा पॉवर–जी** | |
| - औष्णिक | १०,०५४ |
| - जलविद्युत् | १,४४३ |
| **टाटा पॉवर–जीचा एकूण पुरवठा** | **११,४९६** |
| **बाह्य स्रोत** | |
| - आरइन्फ्रा डहाणू | ४,०८७ |
| - पुनर्वापरयोग्य स्रोतांसह वीज खरेदी | २,४१० |
| **मुंबईची एकूण आवश्यकता** | **१७,९९३** |

**१.७.४.१ वीज निर्मितीचा खर्च**

टाटा पॉवर–जी आपल्या वीज निर्मिती केंद्रांसाठी कोळसा, वायू आणि इंधन तेलाचा महत्वाची इंधने म्हणून वापर करते. कोळसा व तेल आयात केले जाते, तर वायू स्थानिक केंद्रांमधून खरेदी केला जातो. कोळशाच्या पुरवठ्यापैकी काही भागाचे नियंत्रण फ्युएल सप्लाय ॲग्रीमेंट्सद्वारे होते तर भारताच्या केंद्र सरकारच्या एमओपीएनजी खात्याने निदेशिलेल्या ॲडमिनिस्टर्ड प्राईस मेकॅनिझमद्वारे वायूची किंमत ठरवली जाते.

टाटा पॉवर–जी आपल्या वीज निर्मिती केंद्रांसाठी कोळसा, वायू आणि इंधन तेलाचा महत्वाची इंधने म्हणून वापर करते. कोळसा व तेल आयात केले जाते, तर वायू स्थानिक केंद्रांमधून खरेदी केला जातो. कोळशाच्या पुरवठ्यापैकी बहुतांश भागाचे नियंत्रण फ्युएल सप्लाय / ट्रान्सपोर्टेशन ॲग्रीमेंट्सद्वारे होते तर भारताच्या केंद्र सरकारच्या एमओपीएनजी खात्याने निदेशिलेल्या ॲडमिनिस्टर्ड प्राईस मेकॅनिझमद्वारे वायूची किंमत ठरवली जाते. आ.व.२००९-१० करिता विविध इंधनांच्या किमतींचा अंदाज करण्यासाठी खालील गोष्टींचा आधार घेतला आहे :

**कोळसा**

पीटी अडारो, पीटी सम्तन आणि इतर इंडोनेशियन कोळसा स्रोतांबरोबर केलेल्या दीर्घ मुदतीच्या करारांद्वारे इंडोनेशियातून आयात केलेल्या कोळशाद्वारे ट्रॉम्बे येथील कोळशाच्या आवश्यकतेची पूर्ती केली जाईल. (१) सध्याची करारकृत किंमत (२) कराराची वैधता आणि (३) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कोळशाच्या किमतीतील चढ-उतार यांच्या आधारे कोळशाची एफओबी किंमत ठरवली जाईल. इंडोनेशियन कोळशाची एफओबी किंमत अमे.डॉलर ७२.१ / मे.टन असल्याचा अंदाज केला आहे. इंडोनेशियातून भारतात कोळसा वाहून आणण्यासाठी टाटा पॉवरने अमे.डॉलर २५ / मे.टन दराने दीर्घ मुदतीचा करार केला आहे. म्हणून आ.व.२००९-१० करिता कोळसा वाहतुकीचा खर्च अमे.डॉलर २५ / मे.टन इतका अंदाजिण्यात आला आहे. हा करार निर्धारित दराचा करार असल्याने बाजारात होणाऱ्या चढ-उतारांचा त्यावर परिणाम होणार नाही.

सध्या लागू असलेले कर आणि आकारांचे कोष्टक विचारात घेऊन आणि ट्रॉम्बे येथील जेट्टीद्वारे हा कोळसा आयात केला जाईल असे गृहीत धरुन निर्मिती केंद्रात पोहोचलेल्या कोळशाची अंदाजित किंमत रु.५,३४३/मे.टन इतकी येते.

**वायू**

आ.व.२००८-०९ करिता इंधन वायूची किंमत सुमारे रु.४५०० / मे.टन होती. वीज आणि खत निर्मिती संचांसाठी विकल्या जाणाऱ्या वायूचा दर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह प्राईस मेकॅनिझम (एपीएम) द्वारे नियंत्रित केला जातो. वायूचा सध्याचा दर रु.४७०० /

मे. टन आहे. आ.व.२००८-०९ च्या या किमतीत वाढ होण्याची शक्यता असली तरी केंद्र सरकारने ही वाढ जाहीर केलेली नाही. आ.व.२००९-१० करिता १० % वाढ गृहीत धरणे शक्य आहे. त्यानुसार वायूची प्रक्षेपित किंमत अंदाजे रु.५,११३ / मे. टन इतकी विचारात घेतली आहे.

**तेल**

इंधन तेलाच्या भावात उच्चतम अमे.डॉलर १५० / बॅरल ते कमीत कमी अमे.डॉलर ५० / बॅरल इतका विस्तृत प्रमाणात बदल होताना दिसला आहे. बाजाराची सध्याची स्थिती आणि आर्थिक मंदीचे सावट विचारात घेता येत्या काही महिन्यात तरी इंधन तेलाचा भाव काय असेल याचा अंदाज बांधणे अत्यंत कठीण आहे. म्हणून इंधन तेलाची अंदाजित किंमत ठरवण्यासाठी सरतेशेवटी आयात केलेल्या इंधन तेलाची किंमत आधारभूत मानली आहे. त्यामुळे इंधन तेलाची प्रक्षेपित किंमत रु.२०,८६० / मे.टन इतकी आहे.

### १.७.४.२ एनर्जी चार्ज (एक्स-बस निर्मिती)

इंधन किमती, जीसीव्हीज् आणि कामकाजविषयक अंदाजित निकषांच्या आधारे हिशोब केलेला विविध संचांचा एनर्जी चार्ज खालीलप्रमाणेः

**तक्ता १-२९ : आ.व.२००९-१० – वीज निर्मितीचा एनर्जी चार्ज**

रु./केडब्ल्यूएच

| युनिट | इंधन | एकत्रित हीट रेट (केकॅल / केडब्ल्यूएच) | ऑक्झि. कन्झ. (%) | नक्त हीट रेट (केकॅल/केडब्ल्यूएच) | कॅल.व्हॅल्यू (केकॅल/किलो) | किंमत (रु./टन) | एनर्जी चार्ज (रु./केडब्ल्यूएच) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| युनिट ४ | तेल | २,५७५ | ८% | २७९९ | १०४५० | २०८६० | ५.५९ |
| युनिट ४ | वायू | २,५७५ | ८% | २७९९ | १३००० | ५११३ | १.१० |
| युनिट ५ | तेल | २,५५५ | ५.५% | २७०४ | १०४५० | २०८६० | ५.४० |
| युनिट ५ | वायू | २,५५५ | ५.५% | २७०४ | १३००० | ५११३ | १.०६ |
| युनिट ५ | कोळसा | २,५५५ | ५.५% | २७०४ | ४९५० | ५३४३ | २.९२ |
| युनिट ६ | तेल | २,४०० | ३.५% | २४८७ | १०४५० | २०८६० | ४.९६ |
| युनिट ६ | वायू | २,४०० | ३.५% | २४८७ | १३००० | ५११३ | ०.९८ |
| युनिट ७ | वायू | १,९७१ | २.७५% | २०२७ | १३००० | ५११३ | ०.८० |
| युनिट ८ | कोळसा + सेकंडरी ऑइल | २,५२५ | ९.६३% | २७९४ | ४९५० | | ३.०४ |

*** कोळसा आणि सेकंडरी ऑइलची किंमत विचारात घेऊन हिशोब केला आहे.**

### १.७.५ भांडवली खर्च

नियंत्रित काळादरम्यान पुढील गुंतवणूक करण्याचे टाटा पॉवर–जीने नियोजित केले आहेः

## तक्ता १-३०: आ.व.२००९-१० – प्रस्तावित भांडवली खर्च आणि भांडवलीकरणाचा सारांश

रु. कोटीमध्ये

| तपशील | आ.व.२००८-०९ | आ.व.२००९-१० | आ.व.२००८-०९ | आ.व.२००९-१० |
|---|---|---|---|---|
| | सुधारित अंदाज | सुधारित अंदाज | सुधारित अंदाज | सुधारित अंदाज |
| | भांडवली खर्च | | भांडवलीकरण | |
| **नॉन-डीपीआर स्कीम्स** | | | | |
| आ.व.०५ पूर्वी सुरु केलेल्या योजना | ० | ० | - | - |
| आ.व.०५ मध्ये सुरु केलेल्या योजना | ४ | ० | ९ | - |
| आ.व.०६ मध्ये सुरु केलेल्या योजना | ५ | १ | ५ | १ |
| आ.व.०७ मध्ये सुरु केलेल्या योजना | २६ | ६ | ३० | ६ |
| आ.व.०८ मध्ये सुरु केलेल्या योजना | ३० | १० | ३४ | १४ |
| आ.व.०९ मध्ये सुरु केलेल्या योजना | | ३९ | | ४२ |
| | | | | |
| **अंतरिम एकूण** | **६५** | **५७** | **७८** | **६२** |
| **डीपीआर केसेस** | | | | |
| आ.व.०५ पूर्वी सुरु केलेल्या योजना | ४३ | २ | ५८ | - |
| आ.व.०५ मध्ये सुरु केलेल्या योजना | ४० | १५ | ३० | - |
| आ.व.०६ मध्ये सुरु केलेल्या योजना | - | | | |
| आ.व.०७ मध्ये सुरु केलेल्या योजना | ७१ | २ | ७० | - |
| आ.व.०८ मध्ये सुरु केलेल्या योजना | ४१ | १३ | २२ | ३२ |
| आ.व.०९ मध्ये सुरु केलेल्या योजना | | ४३ | | १३ |
| | | | | |
| **अंतरिम एकूण** | **१९६** | **७५** | **१८०** | **४५** |
| | | | | |
| **पुढे चालू असलेल्या एकूण योजना** | **२६१** | **१३१** | **२५९** | **१०७** |
| | | | | |
| **नवीन योजना** | | | | |
| नॉन-डीपीआर योजना | ८३ | ११९ | ७९ | ९८ |
| डीपीआर केसेस | ० | ११३ | - | - |
| | | | | |
| **अंतरिम एकूण** | **८३** | **२३२** | **७९** | **९८** |
| वैकल्पिक तरतुदीसह एचओ आणि एसएसचे विभाजन | १२ | २५ | १२ | १५ |
| **एकूण नव्या योजना** | **९५** | **२५७** | **९१** | **११३** |
| | | | | |
| **एकूण निर्मिती** | **३५६** | **३८९** | **३५०** | **२२०** |

**# आयडीसीचा समावेश**

### १.७.६ ॲन्युअल फिक्स्ड चार्जेसचे घटक

**कामकाज व देखभाल खर्च**

सन्माननीय आयोगाने निर्देशित केलेल्या नॉर्म्सच्या आधारे टाटा पॉवर–जीने आपल्या कामकाज व देखभालीच्या खर्चाचा हिशोब रु.३४१ कोटी इतका केला आहे.

टाटा पॉवरच्या अस्तित्वातील युनिट्ससाठी सन्माननीय आयोगाने आ.व.२००८-०९ करिता नॉर्मेटेव्ह बेस्ड कामकाज व देखभाल खर्चास मान्यता दिली आहे. परंतु खाली नमूद केलेल्या नियंत्रण करणे शक्य नसलेल्या घटकांमुळे आ.व.२००९८-०९चा प्रक्षेपित कामकाज व देखभाल खर्च सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असेल अशी अपेक्षा आहे. सन्माननीय आयोगाने अनुसरलेल्या तत्वानुसार, नियंत्रण करणे शक्य नसलेल्या विविध घटकांचा विचार करुन अंदाजिलेल्या आ.व.२००८-०९ मधील खर्चावर ६% वाढ गृहीत धरुन हा कामकाज व देखभालीचा खर्च अंदाजिला आहे.

या तत्वांच्या आधारे, आ.व.२००९-१० करिता हिशोब केलेला कामकाज व देखभाल खर्च खाली दर्शविला आहेः

**तक्ता १-३१: आ.व.२००९-१० – कामकाज व देखभाल खर्च**

**रु. कोटीमधे**

| तपशील | आ.व.२००८-०९ सुधारित अंदाज | आयोगाची मान्यता | आ.व.२००९-१० सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| कर्मचारीसंबंधित खर्च | १५२ | | १५६ |
| व्यवस्थापन व सर्वसाधारण खर्च | ८४ | | ८४ |
| - वजा : ब्रँड इक्विटी | (८) | | (७) |
| दुरुस्ती व देखभाल | ९७ | | १०९ |
| **एकूण** | **३२५** | **३२९** | **३४१** |

### १.७.६.१ व्याज आणि फायनान्स चार्जेस

गत वर्षांच्या नॉर्मेटिव्ह लोन्सवरील (आ.व.२००३-०४ करिता भांडवली खर्चाच्या ७० % आणि आ.व.२००४-०५, आ.व.२००५-०६ व आ.व.२००६-०७ करिता भांडवलीकरणाच्या ७० %) व्याजाव्यतिरिक्त आ.व.२००७-०८ करिता व्याज आणि फायनान्स चार्जेसचा हिशोब आ.व.२००७-०८ दरम्यान भांडवलीकरण करण्यात येत असलेल्या भांडवली खर्चाच्या आधारे केला आहे.

- **आयडीएफसी कर्ज**

टाटा पॉवरने भांडवली खर्चासाठी आयडीएफसीकडून खालील अटींवर रु.४५० कोटींचे कर्ज घेतले आहेः

———————————————————————————————————

| | | |
|---|---|---|
| मुदत | : | ३ वर्षे परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे |
| परतफेड | : | रु.५.६५ कोटीचे ३५ तिमाही हप्ते आणि ३६ वा हप्ता रु.२५२.२५ कोटींचा, या स्वरुपात परतफेड |
| व्याज दर | : | व्याजदर पुनर्निश्चितीच्या तारखेपूर्वी ६ महिने कंपनीचे मूल्यांकन ‘एएए ’ असल्यास बेंचमार्क दर (५ वर्ष जी–सेक दर) + १.४५% प्रतिवर्ष (दरमहा देय)<br>(किमान ८.९०% च्या मर्यादेत)<br>‘एएए ’ असे मूल्यांकन राखणे कंपनीस शक्य न झाल्यास, मुदतीचा पुनर्विचार करण्याचा हक्क आयडीएफसीकडे राहील. |

———————————————————————————————————

कर्जाच्या मुदतकाळादरम्यान वेळोवेळी व्याजाचा दर बदलत राहील असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते. आयडीएफसीने दिनांक २९ सप्टेंबर २००८ च्या पत्राद्वारे हा व्याजदर १३% वर पुन्हा निर्धारित करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार, टाटा पॉवर–जीने आ.व.२००९-१० करिता व्याजाचा १३% दर हिशोबात घेतला आहे.

- **आयडीबीआय कर्ज**

टाटा पॉवरने परवानाक्षेत्रातील भांडवली खर्चासाठी आयडीबीआयकडून खालील अटींवर रु.४०० कोटींचे आणखी एक कर्ज घेतले आहे. या कर्जाच्या परतफेडीच्या अटी पुढीलप्रमाणे आहेतः

| | | |
|---|---|---|
| मुदत | : | ३ वर्ष परतफेड विलंबन अधिकार + ९ वर्षे |
| परतफेड | : | परतफेड विलंबन अधिकाराच्या ३ वर्षांच्या मुदतीनंतर दर वर्षी ५% प्रमाणे ९ वर्षे आणि उर्वरित रक्कम १०व्या वर्षात |
| व्याज दर | : | बी पीएलआर (–) दर साल २.७६% दरमहा देय. कर्जाची रक्कम देण्याच्या दिवशी व्याजाचा दर निश्चित करण्यात येईल. |

या कर्जापोटी आ.व.२००८-०९ दरम्यान देण्यात येत असलेल्या विविध रकमांचा तपशील यापूर्वी दिलेला आहे. त्यानुसार आ.व.२००९-१० मधील भांडवलीकरणाकरिता सरासरी दर ११.५३% इतका गृहीत धरला आहे.

वरील मुद्यांच्या आधारे, आ.व.२००९-१० करिता व्याजापोटीचा खर्च सन्माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या रु.३४ कोटीच्या तुलनेत रु.५७ कोटी इतका अंदाजिला आहे. हा फरक आयडीएफसीकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजदरात झालेली वाढ आणि आयडीबीआयकडून घेतलेले नवे कर्ज यामुळे झाला आहे. परिणामी अर्थबाजारात कर्जाऊ रकमा घेण्यासंदर्भातील खर्चात सर्वसाधारण वाढ झाली आहे.

**वर्किंग कॅपिटलवरील व्याज**

सन्माननीय आयोगाने टेरिफ नियमनांमधे निर्देशित केलेल्या घटकांच्या आधारे वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा हिशोब केला आहे. त्यानुसार वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीच्या खर्चाचा हिशोब करण्यासाठी १३% इतका एसबीआय पीएलआर (सध्याच्या पीएलआरच्या आधारे) गृहीत धरला आहे.

आ.व.२००९-१० करिता टाटा पॉवर–जीचा वर्किंग कॅपिटलवरील व्याजापोटीचा प्रक्षेपित अंदाजित खर्च बहुवर्षीय टेरिफ आदेशात मान्यता मिळालेल्या रु.७८ कोटीच्या तुलनेत रु.९४ कोटी इतका येतो.

**१.७.६.२ टाटा पॉवरच्या लोड कंट्रोल सेंटर (एलसीसी) चार्जेसचा हिस्सा**

आ.व.२००८-०९ करिता टाटा पॉवर–जीसाठी एलसीसी चार्जेसच्या हिश्शाचा हिशोब रु.२ कोटी इतका केला आहे.

**१.७.६.४ अवमूल्यन**

मान्यताप्राप्त रु.७८ कोटीच्या तुलनेत अंदाजित अवमूल्यन रु.६० कोटी इतके आहे.

### १.७.६.३ इक्विटीवरील परतावा

भांडवलीकृत खर्च आणि डेट–इक्विटीचे ७०:३० प्रमाण याच्या आधारे इक्विटीवरील परतावा रु.१६९ कोटी इतका येतो.

### १.७.६.४ आयकर

इक्विटीवरील परताव्यावर लागू असलेल्या सध्याच्या कराच्या दराच्या आधारे आ.व.२००९-१० करिता करासाठीच्या तरतुदीची रक्कम रु.१०७ कोटी इतकी येते.

### १.७.६.५ नॉन-टेरिफ इन्कम

(१) सन्माननीय आयोगाने फरक भरुन काढण्यासाठी रिझर्व्हजची पूर्ण जुळवणी केली आहे आणि (२) पुनरावर्ती नसलेल्या खर्चाच्या बाबींचा अंदाज करता येत नाही, याचा विचार करुन आ.व.२००८-०९ करिता नॉन-टेरिफ इन्कमची अंदाजित रक्कम रु.१७ कोटी इतकी येते.

## १.७.७ ॲन्युअल फिक्स्ड चार्जेसचा सारांश

आ.व.२००९-१० करिता वीज निर्मिती व्यवसायासाठी हिशोब केलेल्या ॲन्युअल फिक्स्ड चार्जेसचा सारांश खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-३२ः आ.व.२००९-१० – टाटा पॉवर–जीचे ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस**

रु. कोटीमधे

| तपशील | आयोगाची मान्यता | आ.व.२००८-०९ सुधारित अंदाज | आ.व.२००९-१० सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| कामकाज व देखभाल खर्च | ३२९ | ३२५ | ३४१ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | ५० | ३५ | ५७ |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ७८ | १२९ | ९४ |
| व्याज आणि फायनान्स चार्जेस | - | (०) | - |
| अवमूल्यन | ८१ | ५१ | ६० |
| आयकर | ३१ | ८८ | १०७ |
| एलसीसीचा हिस्सा | | २.०३ | २.०३ |
| **एकूण फिक्स्ड एक्सपेंडिचर** | **५६९** | **६३०** | **६६२** |
| इक्विटीवरील परतावा | १७२ | १५४ | १६९ |
| वजा : नॉन टेरिफ इन्कम | ७ | १३ | १७ |
| **ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस** | **७३४** | **७७१** | **८१३** |

मान्यताप्राप्त रु.७३४ कोटींच्या तुलनेत अंदाजित ऑन्युअल फिक्स्ड चार्जेसची रक्कम रु.८१३ कोटी इतकी येते हे इथे नमूद केले आहे.

## १.८ युनिट क्र. ८ मधील विजेची विक्री

ट्रॉम्बे येथील २५० मेगावॅट क्षमतेचे युनिट क्र.८ जानेवारी २००९ मधे कार्यान्वयित होण्याची अपेक्षा आहे. यापूर्वी स्पष्ट केल्यानुसार, युनिट क्र.८ ची क्षमता (१) सन्माननीय आयोगाने ६ नोव्हेंबर २००७ च्या आदेशान्वये मान्यता दिलेल्या पीपीए करारांनुसार टाटा पॉवर–डी (५० मेगावॅट) आणि बीईएसटी (१०० मेगावॅट) अशी १५० मेगावॅट क्षमतेची केलेली वाटणी आणि (२) टीपीटीसीएलबरोबर करार करण्यात आलेली १०० मेगावॅट क्षमता, अशा दोन भागात विभागली जाऊ शकते.

युनिट क्र.८ हे ट्रॉम्बे येथे उभारले आहे आणि त्यामुळे ट्रॉम्बेमधील इतर युनिटांसह काही समाईक गरजेच्या प्रक्रिया युनिट क्र.८ साठीही उपयोगात आणल्या जातील याची टाटा पॉवर–जीला कल्पना आहे. या घटकाचा रास्त फायदा मुंबईतील ग्राहकांना व्हावा यासाठी या समाईक पध्दतीने वापरल्या जाणाऱ्या प्रक्रियांच्या खर्चाचा समाईक पध्दतीनेच विचार करावा आणि टाटा पॉवर–जीच्या वितरण परवानाधारकांना करारकृत (१०० मेगावॅट) क्षमतेपैकी विकण्यात येणाऱ्या प्रत्येक युनिटमागे भरपाई मिळावी असा प्रस्ताव आहे. यामुळे टाटा पॉवर–जीचे ॲन्युअल फिक्स्ड चार्जेसदेखील कमी होतील व त्याचा फायदा ग्राहकांना होईल.

सन्माननीय आयोगाने २ एप्रिल २००८ च्या आदेशाद्वारे युनिट क्र.८ करिता तात्पुरत्या स्वरुपाच्या टेरिफला मान्यता दिली होती. तसेच भांडवली खर्चास मान्यता मिळण्यासाठी टाटा पॉवर–जीने सन्माननीय आयोगाकडे स्वतंत्रपणे अर्ज करावा असे निर्देशित केले होते. सन्माननीय आयोगाच्या या निर्देशनाचे पालन करण्यास टाटा पॉवर–जी बांधील आहे. दरम्यान, हा अर्ज सादर करण्याकरिता ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस आणि एनजी चार्जेसला तात्पुरत्या तत्वावर मान्यता द्यावी अशी आम्ही सन्माननीय आयोगास विनंती करतो. आधी उल्लेख केल्यानुसार जानेवारी २००९ मधे युनिट क्र.८ कार्यान्वयित होईल, आणि ते आ.व.२००८-०९ दरम्यान त्याच्या स्टॅबिलायझेशनच्या (सहा महिन्यांच्या) कालावधीपैकी सुमारे तीन महिने कार्यरत राहील.

या भागात आ.व.२००९-१० करिता युनिट क्र.८ साठी तात्पुरत्या टेरिफचा हिशोब करण्याचा प्रयत्न केला असून समाईक प्रक्रियांच्या वापरासंदर्भातील भरपाईचा हिशोब करण्याच्या पध्दतीबद्दल चर्चा केली आहे.

### १.८.१ आ.व.२००८-०९ आणि आ.व.२००९-१० करिता कामकाजविषयक कामगिरी

#### १.८.१.१ वीज निर्मिती

टाटा पॉवर–जीच्या आ.व.२००८-०९ आणि आ.व.२००९-१० साठीच्या अंदाजित (१५० मेगावॅट) वीज निर्मितीचा तपशील खालीलप्रमाणे :

**तक्ता १-३३: आ.व.२००८-०९ व आ.व.२००९-१० – एकत्रित वीज निर्मिती**

मि.यु.

| वीज निर्मिती केंद्र | आ.व.२००८-०९ सुधारित अंदाज | आ.व.२००९-१० सुधारित अंदाज |
|---|---|---|
| युनिट क्र.८ | २६२ | १,२०६ |

#### १.८.१.२ कामकाजविषयक निकषांचा सारांश

खालील तक्त्यात आ.व.२००७-०८ व आ.व.२००८-०९ करिता कामकाजविषयक निकषांचा सारांश दर्शविला आहे :

तक्ता १-३४: आ.व. २००७-०८ व आ.व.२००८-०९ – युनिट क्र.८ करिता कामकाजविषयक निकष

| अनुक्र. | तपशील | | आ.व. २००८-०९ | आ.व. २००९-१० |
|---|---|---|---|---|
| १ | स्टॅबिलायझेशन कालावधी | महिने | ३ | ३ |
| २ | सर्वसाधारण कामकाज कालावधी | महिने | ० | ९ |
| ३ | हीट रेट | | | |
| | - स्टॅबिलायझेशन कालावधीदरम्यान | केकॅल/केडब्ल्यूएच | २६०० | २६०० |
| | - सर्वसाधारण कामकाज कालावधीदरम्यान | केकॅल/केडब्ल्यूएच | २५०० | २५०० |
| ४ | नॉर्मेटिव्ह ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन | | | |
| | - स्टॅबिलायझेशन कालावधीदरम्यान | % | ९.००% | ९.००% |
| | - सर्वसाधारण कामकाज कालावधीदरम्यान | % | ८.५% | ८.५% |
| | अधिक | | | |
| ५ | एफजीडीचे ऑक्झि. कन्झम्प्शन | % | १% | १% |
| ६ | एकूण ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन | | | |
| | - स्टॅबिलायझेशन कालावधीदरम्यान | % | १०.००% | १०.००% |
| | - सर्वसाधारण कामकाज कालावधीदरम्यान | % | ९.५०% | ९.५०% |
| ७ | सेकंडरी ऑइल कन्झम्प्शन | | | |
| | - स्टॅबिलायझेशन कालावधीदरम्यान | एमएल/केडब्ल्यूएच | ४.५० | ४.५० |
| | - सर्वसाधारण कामकाज कालावधीदरम्यान | एमएल/केडब्ल्यूएच | २.०० | २.०० |
| ८ | नक्त हीट रेट | | | |
| | - स्टॅबिलायझेशन कालावधीदरम्यान | केकॅल/केडब्ल्यूएच | २८८९ | २८८९ |
| | - सर्वसाधारण कामकाज कालावधीदरम्यान | केकॅल/केडब्ल्यूएच | २७६२ | २७६२ |
| ९ | पूर्ण वर्षाचा वेटेड ॲव्हरेज पध्दतीने एकूण हीट रेट | केकॅल/केडब्ल्यूएच | २६०० | २५२५ |
| १० | पूर्ण वर्षाचा वेटेड ॲव्हरेज पध्दतीने नक्त हीट रेट | केकॅल/केडब्ल्यूएच | २८८९ | २७९४ |
| ११ | पूर्ण वर्षाचे वेटेड ॲव्हरेज पध्दतीने सेकंडरी ऑइल कन्झम्प्शन | | ४.५ | २.६२५ |
| १२ | पूर्ण वर्षाचे वेटेड ॲव्हरेज पध्दतीने ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन | | १०.००% | ९.६३% |

एनर्जी चार्जेसचा हिशोब करण्यापूर्वी सल्फर डायॉक्साईडचे प्रमाण निर्धारित मर्यादेत राखण्यासाठी युनिट क्र.८ येथे कार्यान्वयित करण्यात येत असलेल्या फ्लू गॅस डी-सल्फरायझेशन (एफजीडी) प्लॅंटमुळे होणारा परिणाम विचारात घेण्याची आवश्यकता आहे असे टाटा पॉवर–जी नम्रपणे नमूद करत आहे. २५० मेगावॉट क्षमतेच्या संचासाठी नॉर्मेटिव्ह ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन ८.५ % असते. परंतु यामध्ये युनिट क्र.८ साठी बसविण्यात येणाऱ्या एफजीडी प्लॅंटच्या ऑक्झिलिअरी कन्झम्प्शनचा समावेश केलेला नाही. युनिट क्र.८ ची उभारणी फ्लू गॅस डी-सल्फरायझेशन (एफजीडी) प्लॅंटसह करण्यात येत असल्याने, युनिट क्र. ८ चे ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन नॉर्मपेक्षा जास्त असेल. परंतु या एफजीडी प्लॅंटच्या प्रत्यक्ष ऑक्झिलिअरी कन्झम्प्शनचे खरे स्वरुप ते प्रत्यक्षपणे कार्यरत असलेला काही काळ गेल्यानंतरच कळेल. परंतु या अर्जासाठी एफजीडी च्या ऑक्झिलिअरी कन्झम्प्शनचा अंदाज घेण्यासाठी आरइन्फ्राच्या डहाणू येथील अशाच स्वरुपाच्या युनिट्सचा विचार केला आहे. त्यानुसार, युनिट क्र.८ च्या एफजीडीच्या ८०% क्षमतेसाठी जुळवणी केल्यानंतर एफजीडीसाठीचे वाढीव ऑक्झिलिअरी कन्झम्प्शन १% असेल असे आ.व.२००८-०९ व आ.व.२००९-१०साठी विचारात घेतले आहे.

### १.८.२ आर्थिक कामगिरी – खर्च

#### १.८.२.१ इंधन खर्च

आ.व. २००८-०९ व आ.व.२००९-१० करिता इंधन खर्च अनुक्रमे रु.८९ कोटी व रु.३३१ कोटी इतका अंदाजिला आहे.

**तक्ता १-३५: आ.व. २००८-०९ व आ.व.२००९-१० – इंधन खर्चाचा तपशील**

| तपशील | आ.व. २००८-०९ सुधारित अंदाज | आ.व. २००९-१० सुधारित अंदाज |
|---|---|---|
| कन्झम्प्शन (मे.टन) | | |
| कोळसा | १३५,३७६ | ६०९,१२१ |
| तेल | १,०६१ | २,८४९ |
| जीसीव्ही (केकॅल) | | |
| कोळसा | ४,९५० | ४,९५० |
| तेल | १०,४५० | १०,४५० |
| किंमत (रु./मे.टन) | | |
| कोळसा | ६,१३६ | ५,३४३ |
| तेल | २८,०७० | २०८६० |
| **एकूण इंधन खर्च (रु. कोटीमधे)** | **८६** | **३३१** |

### १.८.३ युनिट क्र.८ करिता ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस

युनिट क्र.८ च्या ॲन्युअल फिक्स्ड चार्जेसमध्ये पुढील घटकांचा समावेश आहे:

- कामकाज व देखभाल खर्च
- दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज
- वर्किंग कॅपिटलवरील व्याज
- अवमूल्यन
- इक्विटीवरील परतावा
- आयकर

पुढील विवरणात २५० मेगावॉट क्षमतेच्या एका युनिटच्या ॲन्युअल फिक्स्ड चार्जचा हिशोब केला आहे. १५० मेगावॉट क्षमतेसाठी हा हिशोब यथायोग्य प्रमाणात कमी करण्यात आलेला आहे.

#### १.८.३.१ कामकाज व देखभाल खर्च

नव्या क्षमतांच्या बाबतीत सन्माननीय आयोगाने निर्देशित केलेल्या नॉर्म्सच्या आधारे युनिट क्र.८ करिता कामकाज व देखभाल खर्चाचा हिशोब केला आहे. सन्माननीय आयोगाने त्यांच्या टेरिफसंदर्भातील अटी व शर्तीबाबतच्या नियमनांद्वारे नव्याने कार्यान्वयित होणाऱ्या क्षमतांसंदर्भात कामकाज व देखभाल खर्चाचा हिशोब करण्यासंबंधातील निर्देशित केलेले नॉर्म्स खालीलप्रमाणे :

“ (१) कोळशावर आधारित वीज निर्मिती केंद्रे
२०० / २१०.२५० मेगावॅट संचः रु.१०.८२ लाख / मेगावॅट

.. ..

वरील कामकाज व देखभालविषयक नॉर्म्स एप्रिल १, २००५ रोजी सुरु होणाऱ्या आधारभूत वर्षासाठी असून टेरिफ कालावधीतील संदर्भित वर्षासाठी परवानगी देण्यायोग्य कामकाज व देखभाल खर्च काढण्याकरिता या दरात दर वर्षी ४ % वाढ धरण्यात यावी. “

युनिट क्र.८ आ.व.२००८-०९ मध्ये कार्यान्वित होत असल्याने वरील तत्वाच्या आधारे युनिट क्र.८ साठी आ.व.२००८-०९ करिता लागू असलेला नॉर्म प्रत्येक मेगावॅटला १०.८२ × (१.०४)$^{३}$ =१२.१७ लाख येतो आणि आ.व.२००९-१० करिता रु.१२.६५ लाख योतो. त्यानुसार, आ.व.२००८-०९ करिता कामकाज व देखभाल खर्च रु.८ कोटी (३ महिन्यांचे कामकाज) आणि आ.व.२००९-१० करिता रु.३२ कोटी इतका येतो.

**१.८.३.२ कर्जावरील व्याज**

आ.व.२००८-०९ मधील रु.१,१३६ कोटी आणि आ.व.२००९-१० मधील रु.२० कोटी भांडवलीकृत खर्च लक्षात घेता युनिट क्र.८ करिता आ.व.२००८-०९ आणि आ.व.२००९-१० चा व्याजापोटी खर्च अनुक्रमे रु.२३ कोटी आणि रु.९७ कोटी इतका येतो.

**१.८.३.३ वर्किंग कॅपिटलवरील व्याज**

सन्माननीय आयोगाने टेरिफ नियमनाद्वारे निर्देशिलेल्या नॉर्म्सच्या आधारे वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा हिशोब केला आहे. हा व्याजाचा खर्च आ.व.२००८-०९ करिता (एक वर्षाचा हिशोब) रु.२२ कोटी आणि आ.व.२००९-१० करिता रु.२१ कोटी इतका येतो. त्यानुसार, आ.व.२००८-०९ करिता ३ महिन्यांसाठी वर्किंग कॅपिटलवरील व्याजाचा खर्च रु.५ कोटी येतो.

**१.८.३.४ अवमूल्यन**

आ.व.२००८-०९ करिता अंदाजित अवमूल्यन रु.९ कोटी तर आ.व.२००९-१० करिता रु.३८ कोटी आहे.

**१.८.३.५ इक्विटीवरील परतावा**

आ.व.२००८-०९ आणि तर आ.व.२००९-१० करिता इक्विटीवरील अंदाजित परतावा अनुक्रमे रु.१२ कोटी व रु.४८ कोटी आहे.

**१.८.३.६ आयकर**

आयकर कायदा १९६१ द्वारे परवानगी देण्यात आलेल्या खर्चाच्या रकमांचा विचार केल्यानंतर युनिट क्र.८ करिता आ.व.२००८-०९ आणि आ.व.२००९-१० मध्ये करपात्र तोटा होईल असा अंदाज आहे. त्यानुसार युनिट क्र. ८ साठी आ.व.२००८-०९ आणि आ.व.२००९-१० करिता देय कराची रक्कम शून्य धरण्यात आली आहे.

**१.८.४ युनिट क्र.८ करिता ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस**

वरील हिशोबांच्या आधारे, युनिट क्र.८ करिता आ.व.२००८-०९ व आ.व.२००९-१० साठीचे ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस खालील तक्त्यात दिले आहेतः

**तक्ता १-३६: आ.व.२००८-०९ व आ.व.२००९-१० – ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस**

रु. कोटीमधे

| तपशील | आ.व.२००८-०९ | आ.व.२००९-१० | आ.व.२००८-०९ | आ.व.२००९-१० |
|---|---|---|---|---|
| | २५० मेगावॉटकरिता | | १५० मेगावॉटकरिता (एकूण क्षमतेच्या प्रमाणात कमी करुन) | |
| कामकाज व देखभाल खर्च | ८ | ३२ | ५ | १९ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | २३ | ९७ | १४ | ५८ |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ५ | २१ | ३ | १२ |
| अवमूल्यन | ९ | ३८ | ६ | २३ |
| इक्विटीवरील परतावा | १२ | ४८ | ७ | २९ |
| आयकर | - | - | - | - |
| **ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस** | **५७** | **२३५** | **३४** | **१४१** |

## १.८.५ एनर्जी चार्ज

खाली दर्शविल्यानुसार युनिट क्र.८ चा एनर्जी चार्ज प्रति केडब्ल्यूएच रु.३.०४ इतका येतो:

**तक्ता १-३७: आ.व.२००९-१० – युनिट क्र.८ चा एनर्जी चार्ज**

रु./केडब्ल्यूएच

| इंधन | नॉर्म्स जीएम/केडब्ल्यूएच * | कॅल.व्हॅल्यू केकॅल/किलो) | नक्त हीट हिस्सा | किंमत (रु./टन) | एनर्जी चार्ज (रु./केडब्ल्यूएच) |
|---|---|---|---|---|---|
| सेकंडरी ऑइल (जीएम/केडब्ल्यूएच) | २.३६ | १०,४५० | २५ | २०८६० | ०.०५ |
| कोळसा (शिल्लक) | | ४,९५० | २,७६९ | ५,३४३ | २.९९ |
| एकूण | | | २,७९४ | | ३.०४ |

* ०.९ ग्राम/मिली इतकी स्पेसिफिक ग्रॅव्हिटी आणि आ.व.२००९-१० मधील ३ महिन्यांचा स्टॅबिलायझेशन काळ विचारात घेऊन

## १.८.६ टीपीटीसीएलबरोबरच्या करारकृत १०० मेगावॉट क्षमतेसाठी समाईकपणे वापरात येणाऱ्या सेवेचे मूल्य

जानेवारी २००९ मध्ये ट्रॉम्बे येथील २५० मेगावॉट क्षमतेचे युनिट क्र.८ कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. या २५० मेगावॉट क्षमतेच्या युनिट क्र.८ च्या कायान्वयनामुळे ट्रॉम्बेची एकूण निर्मिती क्षमता १५८० होईल. परंतु आधी नमूद केल्यानुसार युनिट क्र.८ च्या २५० मेगावॉट क्षमतेपैकी १०० मेगावॉट क्षमतेबद्दल टीपीटीसीएलबरोबर करार करण्यात आला आहे. या १०० मेगावॉट निर्मितीमध्येदेखील ट्रॉम्बे येथील समाईक स्वरुपाच्या सेवा उपयोगात आणल्या जातील याची रास्त कल्पना आहे. त्यानुसार युनिट क्र.८ मधून निर्मिल्या जाणाऱ्या १०० मेगावॉटसाठी या समाईकपणे वापरल्या जाणाऱ्या सुविधांची (सेवा आणि मालमत्ता) किंमत ठरवणे आवश्यक आहे.

समाईकपणे वापरल्या जाणाऱ्या सुविधांची (सेवा आणि मालमत्ता) किंमत ठरवण्यासाठी (१) समाईक सेवा–सुविधा आणि मालमत्ता (२) अशा समाईक सेवा-सुविधांसंदर्भातील खर्चाचे विविध घटक निश्चित करण्याचा प्रस्ताव आहे. अशा खर्चाच्या रकमेचा उपयोग त्यानंतर या समाईक सेवा-सुविधांच्या देखभालीसाठी येणाऱ्या खर्चाचा हिस्सा व्यापारी/करारकृत क्षमता-विक्रीवर केलेल्या विक्रीच्या प्रमाणात लादण्यासाठी केला जाऊ शकतो.

या हिशोबासंदर्भात निश्चित केलेल्या समाईकपणे वापरल्या जाणाऱ्या सेवा-सुविधा आणि मालमत्ता अशा –

- कोल जेट्टी
- कोल यार्ड
- डीएम प्लँट
- रॉ वॉटर सिस्टिम
- स्विचयार्ड
- सीडब्ल्यू सिस्टिम
- व्यवस्थापन व सुरक्षा
- हाऊसिंग कॉलनी
- समाईक रस्ते व बांधकामे
- ड्रेजिंग
- पर्यावरण नियंत्रक
- राख व्यवस्थापन
- कोळसा व्यवस्थापन
- मालमत्ता आणि पाणी कर व आकार

अशा समाईक सेवा-सुविधांसदर्भातील खर्चाचे निश्चित केलेले घटक पुढीलप्रमाणे :

- अशा समाईक सेवा-सुविधांसदर्भातील कामकाज व देखभाल खर्च
    - समाईक सेवा-सुविधांबाबतच्या एकूण खर्चात अशा सेवासुविधांचा कर्मचारीसंबंधित खर्चासह कामकाज व देखभाल खर्च समाविष्ट असेल;
    - दुरस्ती आणि देखभाल खर्चाच्या कोल हँडलिंग सिस्टिम, अँश हँडलिंग सिस्टिमसारख्या फक्त कोळशावर आधारित युनिट्ससाठी वापरल्या जाणाऱ्या गोष्टींबाबतचा खर्च युनिट क्र.५ व युनिट क्र.८ मध्ये त्यांच्या निर्मितीक्षमतेनुसार विभागला आहे कारण इतर युनिट्समधे वीज निर्मितीसाठी कोळसा वापरला जात नाही;
    - कामकाज व देखभालीच्या खर्चाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी आ.व.२००७-०८ मधील प्रत्यक्ष कामकाज व देखभाल खर्च संदर्भासाठी घेतला आहे;
    - सेवा-सुविधांच्या वापरानुसार त्यासंबंधीचा खर्च विभागला आहे –उदा. ॲश व कोल हँडलिंग सेवा-सुविधांबाबतचा खर्च युनिट क्र.४, ५ व ७ मध्ये विभागण्यात आलेला नाही;
- इतर मालमत्ता बरीच जुनी असल्याने (सीआयआरसीए १९८४-९३) आणि या मालमत्तेसंदर्भातील या सदराखालील हिस्सा नगण्य असल्याने फक्त कोलयार्ड आणि कोल जेट्टीसंदर्भातील व्याज
- वर उल्लेख केलेल्या कारणासाठी फक्त कोलयार्ड आणि कोल जेट्टीसंदर्भातील अवमूल्यन; आणि
- कोलयार्ड आणि कोल जेट्टीसंदर्भातील आरओई

अशा मालमत्तेवरील खर्चातील युनिट क्र.८ च्या हिश्शाचा खर्च वेगळा काढण्यासाठी या मालमत्तेकडून सेवा-सुविधा पुरवण्यात येणाऱ्या युनिट क्र.८ च्या एकूण निर्मिती-क्षमतेच्या टक्केवारीच्या प्रमाणात करारकृत क्षमतेचा (१०० मेगावॉट) असलेला हिस्सा आधारभूत मानला आहे.

### एक. अतिरिक्त गृहीतकेः

- o खर्चाच्या सदरांचे प्रत्येक युनिटच्या निर्मितीक्षमतेजुसार विभाजन केलेले आहे
- o हिशोबासाठी इतर आर्थिक गृहीतके विचारात घेतली आहेत

**तक्ता १-३८: आ.व.२००९-१० – आर्थिक गृहीतके**

%

| आर्थिक गृहीतके | |
|---|---|
| कर्जावरील व्याजाचा दर | १०% |
| अवमूल्यनाचा दर | ३.६% |
| कर्ज | ७०% |
| इक्विटी | ३०% |
| आरओई | १४% |

### दोन. खर्चाचा हिशोब

विभाजन केलेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-३९: युनिट क्र.८–१०० मेगावॉटकरिता एकूण विभाजित हिस्सा**

| तपशील | | आ.व. २००८-०९ | आ.व. २००९-१० | आ.व. २०१०-११ | आ.व. २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| युनिट क्र.८ करिता भांडवली खर्चाचा हिस्सा | रु. कोटीमधे | ४ | ४ | ४ | ४ |
| कामकाज व देखभाल खर्च (दरसाल ५% वाढ धरुन) | रु. कोटीमधे | ४ | ४ | ४ | ४ |
| **एकूण** | **रु. कोटीमधे** | **७** | **८** | **८** | **८** |

करारकृत क्षमतेच्या प्रमाणात हिशोब केलेला खर्चाचा हिस्सा दर वर्षासाठी रु.७ कोटी ते रु.८ कोटी या दरम्यान येतो. करारकृत क्षमतेसाठी देय ठरणारी रक्कम ठरवण्यासाठी ही पध्दत चांगली आणि त्याचबरोबर अतिशय सोपी आहे असे टाटा पॉवर–जीचे मत आहे. म्हणून या संख्यांच्या आधारे वितरण परवानाधारकांना भरपाई देण्याचे प्रस्तावित आहे.

## १.९ वीज दर प्रस्ताव

### १.९.१ करारकृत क्षमता

यापूर्वी देण्यात आलेल्या टाटा पॉवर–जीच्या निर्मितीक्षमतेच्या विभाजनाबाबतच्या स्पष्टीकरणांच्या आधारे, प्रक्षेपित अंदाजासाठी विचारात घेतलेली परवानाधारकांबरोबरची करारकृत क्षमता पुढीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-४०: टाटा पॉवर–जीची (अस्तित्वातील युनिट्सची) करारकृत क्षमता**

| | टाटा पॉवर–जीबरोबरच्या पीपीए कराराचे स्वरुप | अस्तित्वातील संचांच्या क्षमतेपेकी प्रक्षेपित अंदाजासाठी विचारात घेतलेली क्षमता (मेगावॉटमधे) | % |
|---|---|---|---|
| **बीईएसटी** | स्वाक्षरीकृत आहे. | ८०० | ४५.०२ |
| **टाटा पॉवर–डी** | स्वाक्षरीकृत आहे. | ४७७ | २६.८४ |
| **उर्वरित क्षमता** | | ५०० | २८.१४ |
| **एकूण** | | **१,७७७** | |

तक्ता १-४१ : युनिट क्र.८ ची करारकृत निर्मिती - क्षमता

| | टाटा पॉवर–जीबरोबरच्या पीपीए कराराचे स्वरुप | अस्तित्वातील संचांच्या क्षमतेपेकी प्रक्षेपित अंदाजासाठी विचारात घेतलेली क्षमता (मेगावॅटमधे) | % |
|---|---|---|---|
| **बीईएसटी** | स्वाक्षरीकृत आहे. | १०० | ४०.०० |
| **टाटा पॉवर–डी** | स्वाक्षरीकृत आहे. | ५० | २०.०० |
| **उर्वरित क्षमता** | | १०० | ४०.०० |
| **एकूण** | | **२५०** | |

### १.९.२ ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस

आ.व.२००९-१० करिता औष्णिक आणि जलविद्युत् केंद्रांसाठीचे ॲन्युअल फिक्स्ड चार्जेस खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहेत. प्रत्येक संच आणि केंद्र नॉर्मेटिव्ह पातळीपेक्षा बऱ्याच जास्त प्रमाणात उपलब्धता व क्षमता निर्देशांक साध्य करणार असल्यामुळे, ॲन्युअल फिक्स्ड चार्जेसची पूर्ण वसुली करण्यास टाटा पॉवर–जी पात्र आहे.

तक्ता १-४२: आ.व.२००९-१० – ॲन्युअल फिक्स्ड चार्ज : औष्णिक व जलविद्युत् क्षमतेनुसार विभाजन

रु. कोटीमधे

| तपशील | औष्णिक वीज निर्मिती | | जलविद्युत् निर्मिती | एकूण वीज निर्मिती |
|---|---|---|---|---|
| | युनिट ४ ते युनिट ७ | युनिट ८ (१५० मेगावॅट) | | |
| कामकाज व देखभाल खर्च | २७० | १९ | ७१ | ३६० |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | ३९ | ५८ | १८ | ११५ |
| वर्किंग कॅपिटलवरील व्याज | ८८ | १२ | ६ | १०६ |
| अवमूल्यन | ३० | २३ | ३१ | ८३ |
| इक्विटीवरील परतावा | ११० | २९ | ५९ | १९८ |
| आयकर | ७० | - | ३७ | १०७ |
| लोड कंट्रोल सेंटरसंबंधित किमतीचा हिस्सा | १ | - | १ | २ |
| **एकत्रित फिक्स्ड चार्जेस** | **६०८** | **१४१** | **२२३** | **९७१** |
| वजा : नॉन-टेरिफ इन्कम | १२ | - | ६ | १७ |
| **नक्त फिक्स्ड चार्जेस** | **५९६** | **१४१** | **२१७** | **९५४** |

### १.९.३ एनर्जी चार्ज

प्रत्येक औष्णिक युनिटच्या एनर्जी चार्जचा हिशोब खालीलप्रमाणे :

तक्ता १-४३: आ.व.२००९-१० वीज निर्मितीचा एनर्जी चार्ज

रु./केडब्ल्यूएच

| युनिट | इंधन | एकत्रित हीट रेट (केकॅल / केडब्ल्यूएच) | ऑक्झि. कन्झ. (%) | नक्त हीट रेट (केकॅल/केडब्ल्यूएच) | कॅल.व्हॅल्यू (केकॅल/किलो) | किंमत (रु./टन) | एनर्जी चार्ज (रु./केडब्ल्यूएच) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| युनिट ४ | तेल | २,५७५ | ८.००% | २७९९ | १०४५० | २०८६० | ५.५९ |
| युनिट ४ | वायू | २,५७५ | ८.००% | २७९९ | १३००० | ५११३ | १.१० |
| युनिट ५ | तेल | २,५५५ | ५.५०% | २७०४ | १०४५० | २०८६० | ५.४० |
| युनिट ५ | वायू | २,५५५ | ५.५०% | २७०४ | १३००० | ५११३ | १.०६ |
| युनिट ५ | कोळसा | २,५५५ | ५.५०% | २७०४ | ४९५० | ५३४३ | २.९२ |
| युनिट ६ | तेल | २,४०० | ३.५०% | २४८७ | १०४५० | २०८६० | ४.९६ |
| युनिट ६ | वायू | २,४०० | ३.५०% | २४८७ | १३००० | ५११३ | ०.९८ |
| युनिट ७ | वायू | १,९७१ | २.७५% | २०२७ | १३००० | ५११३ | ०.८० |
| युनिट ८ | कोळसा + सेकंडरी ऑइल | २,५२५ | ९.६३% | २७९४ | ४९५० | | ३.०४ |

* कोळसा आणि सेकंडरी ऑइलची किंमत विचारात घेऊन हिशोब केला आहे.

वरील मुद्यांच्या आधारे, प्रत्येक संच/केंद्राचा एकूण सूचित वीज दर खाली दिल्याप्रमाणे आहेः

तक्ता १-४४: आ.व.२००९-१० – एकूण सूचित वीज दर

| संच / केंद्र | क्षमता (मेगावॅट) | फिक्स्ड रेट (रु./केडब्ल्यूएच) * | व्हेरिएबल चार्ज (रु./केडब्ल्यूएच) | एकूण (रु./केडब्ल्यूएच) |
|---|---|---|---|---|
| जलविद्युत् | | | | |
| खोपोली | ७२ | १.६५ | | |
| भिवपुरी | ७५ | १.०९ | | |
| भिरा | ३०० | ०.४० | | |
| **एकूण जलविद्युत्** | **४४७** | **०.७०** | | **०.७०** |
| | | | | |
| युनिट क्र.४ – तेल | १५० | .११ | ५.५९ | ५.७० |
| युनिट क्र.५ – कोळसा | ५०० | ०.६८ | २.९२ | ३.६० |
| युनिट क्र.६ – तेल | ५०० | ०.६२ | ४.९६ | ५.५८ |
| युनिट क्र.७ – वायू | २५० | १.०४ | ०.८० | १.८४ |
| युनिट क्र.८ – तेल | २५० | १.६१ | ३.०४ | ४.६५ |
| एकूण औष्णिक | १,५८० | ०.७२ | ३.४८ | ४.२१ |

* ८०% पीएलएफ किंवा प्रत्यक्ष पीएलएफ यापैकी जो जास्त असेल तो विचारात घेऊन

## १.९.४ इन्सेन्टिव्ह

जलविद्युत् आणि औष्णिक वीज निर्मिती केंद्रांसाठीच्या टाटा पॉवर–जीच्या इन्सेन्टिव्ह्जचा हिशोब सन्माननीय आयोगाच्या निर्देशनानुसार केला जाईल तसेच त्याची आकारणी प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित असेल.

### १.९.५ अत्युच्च मागणी असलेला (पीक) आणि नसलेला (ऑफ पीक) काळ

सन्माननीय आयोगाने काटकसरीची जाणीव वाढवण्यासाठी अत्युच्च मागणी असल्याच्या आणि नसल्याच्या काळाच्या तुलनेत जलविद्युत् निर्मिती कमी असेल असा विचार केला आहे. तसेच या काळातील जलविद्युत केंद्रांमधील निर्मितीसाठी वेगळे वीज दर दिले आहेत. निश्चित केलेले अत्युच्च मागणीचे कालावधी सकाळी ९ ते १२ आणि संध्याकाळी ६ ते रात्री १० असे निर्देशित केले आहेत.

परंतु टाटा पॉवर–जी असे विनीत करु इच्छिते, की मुंबईच्या विजेच्या मागणीसंदर्भात अत्युच्च मागणीचा काळ हा सकाळी १० ते दुपारी २ आणि संध्याकाळी ६ ते रात्री १० असा असल्याचे निरीक्षणाअंती आढळले आहे. या निरीक्षणानुसार मुंबईच्या अत्युच्च मागणीच्या काळामध्ये बदल करावयाची सन्माननीय आयोगास नम्र विनंती आहे.

यामुळे जलविद्युत् केंद्रांना या अत्युच्च मागणीच्या काळात काटकसरीचा वीज दर राखण्यासाठी कार्यरत राहण्याची आणि फ्रिक्वेन्सी नियंत्रणात राखण्याची योग्य सूचनादेखील मिळेल.